दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

## देशात रेल्वे अपघातांची मालिका

**ॲड. प्रकाश आंबेडकर** :मोदींवर सडकून टिका



नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

रेल्वे अपघातात मौल्यवान जीव गेले आणि कितीतरी जखमी झाले. गेल्या काही वर्षांत जवळजवळ प्रत्येक महिन्यात रेल्वे अपघाताच्या घटना होत आहेत. पंतप्रधान मोदींनी भारताला जगातील रेल्वे अपघाताची राजधानी बनविल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी ट्विटरच्या माध्यमातून केली.

ॲड. आंबेडकर म्हणाले की, मोदी सरकारकडून फक्त जाहिराती केल्या जातात पण, जबाबदारी पार पाडली जात नाही, रेल्वेमंत्र्यांनी राजीनामा द्यावा. देशात रेल्वे अपघातांची मालिका सुरुच आहे. गेल्या दोन वर्षांत पूर्वोत्तर भागात मोठे रेल्वे अपघात झाले आहेत. त्यात आता आणखी एका अपघाताची भर पडली आहे. हावडा-मुंबई मेल एक्स्प्रेस ट्रेनचा भीषण अपघात झाला आहे. हावडा-मुंबई मेल एक्सप्रेस रुळावरून घसरून एक मालगाडीला धडकली. या अपघातात दोन जण ठार, तर अनेक जण जखमी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर ड. आंबेडकर यांनी संताप व्यक्त केला आहे.

## लाखो शेतकऱ्यांनी भरला एक रुपयात पीकविमा


**धनंजय मुंडे** : रुग्णालयातून मुंडेंकडून कृषी खात्याचा आढावा

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी



प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत एक रुपयात पीक विमा ही संकल्पना राबविणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य असून, खरीप २०२४ हंगामात ३१ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत १ कोटी ६३ लाख ६० हजार पेक्षा अधिक पीकविमा अर्ज दाखल करण्यात आले असून, लाखो शेतकऱ्यांनी एक रुपया विमा सहभाग भरून पिकविमा योजनेत याही वर्षी सहभाग घेतला आहे. आज ३१ जुलै हा विमा भरण्यासाठी अखेरचा दिवस असून उर्वरित पात्र शेतकऱ्यांनी आपला विमा तात्काळ भरून घ्यावा व आपले पीक विमा संरक्षित करावे असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे. विशेष म्हणजे मागील २४ तासात राज्यभरातून तब्बल ५ लाख ७४ हजार शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा विमा भरला आहे.

धनंजय मुंडे यांच्यावर शुक्रवारी (ता.२७) मुंबईतील सर एच.एन.रिलायन्स फाऊंडेशन रुग्णालयात पित्ताशयाची शस्त्रक्रिया करण्यात आली असून ते पुढील उपचार घेत आहेत. दरम्यान रुग्णालयातूनही त्यांच्याकडून कृषी विभागाचा आढावा घेणे सुरूच आहे. पीक विम्यासह विविध योजनांचा आढावा ते सातत्याने घेत आहेत.




## हमासच्या राजकीय प्रमुखाची हत्या!

**खळबळ** : हमासने इस्त्रायलला धरलं जबाबदार

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी



गेल्या काही महिन्यांपासून इराण आणि इस्त्रायलमध्ये तणावाचं वातावरण पाहायला मिळत होतं. अशातच आता एक मोठी बातमी समोर आली असून इराणच्या तेहरानमध्ये हमासचा राजकीय प्रमुख इस्माईल हानियाची हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने (खठ्रऋउ) एका निवेदनात यासंदर्भात माहिती दिली आहे. तेहरानमधील इस्माईल हानियाच्या निवासस्थानाला लक्ष्य करण्यात आलं होतं. निवासस्थानाबाहेर झालेल्या स्फोटात हमासचा राजकीय प्रमुख इस्माइल हानिया आणि एका रक्षकाचा मृत्यू झाला आहे. यासंदर्भातील वृत्त रॉयटर्सने दिलं आहे. इस्माईल हानियाच्या निवासस्थानावर झालेल्या स्फोटाला आणि इस्माईल हानियाच्या मृत्यूला हमासने इस्त्रायलला जबाबदार धरलं असल्याचं म्हटलं आहे.इस्माईल हानियाचा जन्म १९६२ मध्ये गाझा पट्टीत झाला. पॅलेस्टिनी नेता म्हणून इस्माईल हानियाला ओळखलं जात होतं. २०१७ मध्ये हमासचा प्रमुख राजकीय नेता म्हणून इस्माईल हानियाला ओळखलं जात होतं.

## मयताच्या कुंटुबियांना मदतीचा हात

**माणूसकी** :तिगांव येथे भेट घेत मदत केली सुपूर्त

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी



तारखेला बीड येथे झालेल्या मराठा शांतात रँली करुन परत येत असलेल्या तिगांवच्या तरुणाचा घाटसावळी नजीक अपघात होऊन मृत्यू झाला होता. या कुंटुबियांची आज युवा नेते जयसिंहभैय्या सोळंके यांनी भेट घेत विचारपुस केली व मयताच्या वारसाना आर्थिक मदत केली आहे.

याबाबत आधिक माहिती अशी कि, वडवणी तालुक्यातील तिगांव येथील रहिवाशी तरुण आणि मराठा आरक्षण लढ्यतील जनसेवक व शेतकरी बाबासाहेब भिमराव मुळे या ३५ वर्षीय तरुणाचा दि.११ रोजी बीड येथील मराठा शांतता रँली संपन्न करुन परत गांवी येत आसताना घाटसावळी नजीक अपघात होऊन दुदैवी मृत्यू झाला होता. यामध्ये घरचा प्रमुखाचे अशा अपघाताने मृत्यू होणे काळजाचा ठोका चुकल्या लगत आहे. या कुंटुबाला पुढील जिवन जगण्यासाठी या कुंटुबाला आर्थिक हातभार लागावा या एकमेव उद्देशाने माजलगांव विधानसभा मतदार संघाचे युवा नेते तथा जि.प. विद्यमान सभापती जयसिंहभैय्या सोळंके यांनी मुळे कुंटुबियाची सक्षम भेट घेत सांत्वन केले, विचारपुस करत आर्थिक मदतीचा धनादेश कुंटुबाकडे सपुर्त देखील केला आहे. नगराध्यक्ष शेषराव जगताप, यावेळी जि. प. सदस्य औदुंबर सावंत, युवा नेते आनंद काळे, तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, युवा नेते अंगद मुंडे, युवा नेते माजी सरपंच लखन महागोविंद, ग्रा. प. सदस्य वैभव मस्के, युवा नेते शहादेव शेंडगे, हनुमान शेंडगे, सर्जेराव शेंडगे, इश्वर मुळे, कैलास बन्सोडे यासह आदि जण उपस्थित होते.

## जाहिरातींच्या तक्रारींसाठी डॅशबोर्ड तयार करा

**निर्णय** : सर्वोच्च न्यायालयाचे केंद्रीय आयुष मंत्रालयाला आदेश

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी



दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर दाखल केलेल्या तक्रारींचा तपशील आणि त्यावरील कार्यवाही ग्राहकांना उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रीय आयुष मंत्रालयाने एक डॅशबोर्ड तयार करावा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिले. न्यायमूर्ती हिमा कोहली आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर भारतीय वैद्याक संस्थेने (आयएमए) दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी सुरू आहे. यामध्ये पतंजली आयुर्वेद लिमिटेडवर कोविड लसीकरण आणि आधुनिक औषध प्रणालींविरुद्ध खोट्या मोहिमेचा आरोप ठेवण्यात आला आहे. प्राप्त तक्रारींवर कारवाई करण्याबाबत योग्य माहिती नसल्यामुळे ग्राहकांना अंधारात टाकले जाते, असे खंडपीठाने नमूद केले.औषधे आणि जादूचे उपाय (आक्षेपार्ह जाहिराती) कायदा १९५४ आणि नियम, औषधे आणि सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० आणि ग्राहक संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत

पान २ वर...

## अरुण गवळीला पुन्हा तुरुंगात जावं लागणार?

### सर्वोच्च न्यायालयाचा पॅरोलवर सुट्टी देण्यास नकार

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी



कुख्यात डॉन अरुण गवळीला पॅरोलवर सुट्टी देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. त्यामुळे अरुण गवळीला तुरुंगातच राहवं लागण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी अरुण गवळीला उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार, मुदतपूर्व सुटका करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. यानंतर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी अरुण गवळीला सुट्टी देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. त्यामुळे अरुण गवळीला धक्का बसला असून तुरुंगातच राहावं लागण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या याचिकेवरील पुढची सुनावणी नोव्हेंबरमध्ये होणार आहे. अरुण गवळीने वयाचे कारण देत सुट्टी देण्याची मागणी केली होती. गँगस्टर अरुण गवळीला न्यायालयाने दिलेल्या मुदतपूर्व सुटकेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. आता याच प्रकरणावर पुन्हा नोव्हेंबरमध्ये सुनावणी होणार असून नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांच्या हत्येच्या प्रकरणात अरुण गवळीला जन्मठेपेची शिक्षा झाली होती.जामसंडेकर यांच्यावर गोळीबार झाल्याचं कळताच गर्दी जमा झाली. त्या गर्दीचा फायदा घेऊन हल्लेखोर तिथून पळाले. कमलाकर जामसंडेकर यांना रुग्णालयात आणण्यात आलं. मात्र तोपर्यंत त्यांची प्राणज्योत मालवली होती. डॉक्टरांनी त्यांना मृत

पान २ वर...

# त्या गद्दारीचे सरदार कोण होते?

**पलटवार** | सुनील तटकरेंचं संजय राऊतांना प्रत्युत्तर


मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी



शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर हल्लाबोल करताना सुनील तटकरे हे फिरता रंगमंच आहेत. अजित पवार यांना अडचणीत आणण्याचं काम या फिरत्या रंगमंचाने केलं अशी खोचक टीका संजय राऊत यांनी केली. त्यांच्या या टिकेनंतर आता खासदार सुनील तटकरे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. २०१९ साली महाराष्ट्राच्या जनतेशी गद्दारी कोणी केली? त्या गद्दारीचे सरदार कोण होते? त्या गद्दारीचे शिलेदार कोण होते? हे देखील सर्वांना माहिती आहे, असा हल्लाबोल सुनील तटकरे यांनी यांनी केला.

आता फिरता रंगमंच असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे. पण फिरता रंगमंच म्हणजे काय याचा अर्थ त्यांनीच सांगावा. सध्या संजय राऊतांची लेखनी खालच्या पातळीवर गेली आहे. २०१९ साली महाराष्ट्राच्या जनतेशी गद्दारी कोणी केली? त्या गद्दारीचे शिलेदार कोण होते? हे सर्वांना माहिती आहे. कारण २०१९ च्या निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेनी कोणत्या पक्षाला कौल दिला होता? २०१९ च्या विधानसभेची निवडणूक भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना अशी युती म्हणून लढवली गेली होती. मग महाराष्ट्रातील जनतेचा विश्वासघात करणारा गद्दार कोण? त्या गद्दारीचे नायक कोण? हे देखील महाराष्ट्राला माहिती आहे. त्यामुळे त्यांनी माझ्यावर टीका टिप्पणी करण्याचं काम करु नये, असं सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे.२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर कोण कोणाला छुप्या पद्धतीनं भेटत होतं. आता त्यावेळी वेश बदलून जायचे की जॅकेट घालून जात होते, हे त्यांनाच माहिती, असा टोलाही सुनील तटकरे यांनी संजय राऊत यांना लगावला. तटकरे पुढे म्हणाले, अनौपचारिक गप्पांमध्ये अजित पवार काहीही बोलले नाहीत. मात्र, एक नरेटीव्ह तयार करण्याच काम केलं जात आहे. अजित पवार यांना बदनाम करण्याचं काम विरोधक करत आहेत, असा आरोप तटकरे यांनी केला.

## धनंजय मुंडेंच्या प्रकृतीची विचारपूस



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी आज मुंबई येथील सर एच एन रिलायन्स फाउंडेशन च्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेले कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली.

श्री धनंजय मुंडे यांच्यावर मागील शुक्रवारी पित्ताशयाची शस्त्रक्रिया करण्यात आली होती.त्याआधी आज सकाळी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तर काल काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे यांनीही मुंडे यांची भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली होती. मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनीही दूरध्वनी द्वारे संपर्क करून मुंडेंच्या प्रकृतीची माहिती घेतली.

# 'पॉवरपॉइंटी' पोपटपंची!

निती आयोगाची गेल्या आठवड्यातील बैठक १० मुख्यमंत्र्यांनी तिकडे पाठ फिरवल्यामुळे गाजली. देशातील ३५ पैकी १० राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी या पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील बैठकीला उपस्थित राहणे टाळले. म्हणजे जवळपास एकतृतीयांश राज्यांचे प्रतिनिधी या बैठकीस गेले नाहीत. यात तमिळनाडू, कर्नाटक, केरळ आदी नऊ राज्यांचा समावेश आहे आणि आश्चर्याची बाब म्हणजे केंद्र सरकारच्या स्थैर्यासाठी आवश्यक अशा बिहार राज्याचे नितीश कुमार यांचाही अनुपस्थितांत समावेश आहे. पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी गेल्या खऱ्या! पण आपणास बोलू दिले जात नाही, असा आरोप आणि नंतर थयथयाट करत त्यांनी सभात्याग केला. जे झाले त्यावर आपापल्या बौद्धिक मगदुराप्रमाणे आणि राजकीय विचारबंधाप्रमाणे विश्लेषण केले जाईल आणि त्याप्रमाणे कोण निर्दोष, कोणाचा दोष इत्यादी प्रमाणपत्रे दिली जातील. पण या विश्लेषणात जाण्यात अर्थ नाही. जेव्हा मोठे हे मोठ्याप्रमाणे वागत आणि वाटत नाहीत तेव्हा लहानांकडून आदराची अपेक्षा करणे निरर्थक असते, हे यातील वैश्विक सत्य. ते लक्षात घेत सभात्याग वगैरे मुद्दे चॅनलीय चर्चांसाठी सोडून या निती आयोग बैठकीचा विचार व्हायला हवा. कारण त्यात 'विकसित भारत' घडवण्यासाठी काय करावे लागेल, कोणत्या मार्गाने जावे लागेल इत्यादी मुद्द्यांवर ऊहापोह होऊन एक निबंध प्रसृत करण्यात आला. तो अधिक महत्त्वाचा.त्यानुसार स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वर्षापर्यंत, म्हणजे २०४७ सालापर्यंत, भारतास आपली अर्थव्यवस्था ३० लाख कोटी डॉलर्स इतकी वाढवण्याचे उद्दिष्ट 'ठेवावे' लागेल आणि त्याचबरोबर आपले दरडोई उत्पन्न प्रतिवर्षी १८ हजार डॉलर्स इतके 'वाढवावे' लागेल. सध्या भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन साधारण ३.४ लाख कोटी डॉलर्स इतके आहे आणि भारतीयांचे दरडोई उत्पन्न २,३९२ डॉलर्स इतके आहे. म्हणजे अर्थव्यवस्था तीन लाख कोटी डॉलर्सवरून ३० लाख कोटी डॉलर्सवर न्यायची आणि त्याच वेळी दरडोई उत्पन्न दोन–अडीच हजार डॉलर्सवरून थेट १८ हजार डॉलर्सवर न्यायचे. यातील दुसरे आव्हान अधिक मोठे. कारण अर्थव्यवस्थेचा आकार काही प्रमाणात आपोआप वाढतोच वाढतो. तो लवकरच पाच लाख कोटी डॉलर्स इतका होईल आणि भारतास पहिल्या पाच अर्थव्यवस्थांत स्थान मिळवून देईल. पण देशाची अर्थव्यवस्था वाढली म्हणून नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढतेच असे नाही. म्हणजे एखाद्या गावाचे सरासरी सकल ग्राम उत्पादन त्या गावातील दोन–पाच धनाढ्यांमुळे वाढू शकते. पण याचा अर्थ त्या गावातील प्रत्येक ग्रामस्थ सधन झाला असा जसा होत नाही तसेच देशाची अर्थव्यवस्था मोठी झाली याचा अर्थ त्या देशातील नागरिकांची कमाई वाढली असा नसतो. त्यासाठी देशाच्या अर्थव्यवस्थेबरोबर नागरिकांचे दरडोई उत्पन्नही वाढावे लागते. ते जर दोन हजार डॉलर्सपेक्षा कमी असेल तर त्या देशांतील नागरिकांची गणना 'गरीब' अशीच केली जाते. आपले हे उत्पन्न २,३९२ डॉलर्स इतके आहे. ते पुढील २३ वर्षांत साधारण ९०० टक्क्यांनी वाढवून १८ हजार डॉलर्सवर न्यायला हवे असे निती आयोगास वाटते. तसे झाले तरच भारताची गणना उच्च उत्पन्न देशांत केली जाईल. याचा अर्थ असा की केवळ अर्थव्यवस्था दुसऱ्या वा तिसऱ्या क्रमांकावर आली म्हणून आपली अर्थयत्ता बदलणारी नाही. त्यासाठी नागरिकांचे सरासरी दरडोई उत्पन्न वाढवून ते १४ हजार डॉलर्सपेक्षा अधिक करावे लागेल. कारण १४ हजार डॉलर्स ही विकसित आणि सधन म्हणवून घेण्यासाठी जागतिक बँकेने निश्चित केलेली किमान आवश्यकता. ''भारताने अल्पउत्पन्न गटात अडकले जाण्याचा सापळा टाळायला हवा'', असे मत निती आयोगाच्या या निबंधात व्यक्त करण्यात आले आहे.देशाची गणना श्रीमंत गटांत व्हावी असे प्रयत्न करावयाचे असतील तर आधी देशातील कथित 'गरिबांना' मोफत रेशनादी सुविधा देणे थांबवायला हवे. सुमारे १३० कोटी भारतीयांत या सुविधेमुळे ज्यांना चार घास मिळतात अशांची संख्या सरकार म्हणते त्याप्रमाणे ८० कोटी इतकी असेल तर निम्म्यापेक्षा अधिक दरिद्रींना घेऊन हा देश श्रीमंत कसा होणार?

निती आयोगाचे अध्यक्ष असलेल्या पंतप्रधानांस अर्थव्यवस्थेचे डोळे पांढरे करणाऱ्या रेवडी संस्कृतीचा कोण राग! पण मध्य प्रदेशात त्यांच्या पक्षाची सत्ता आली ती 'लाडली बहना' या योजनेमुळे. खरे तर पंतप्रधानांनी आणि निती आयोगातील या विद्वानांनी अशी रेवडी वाटण्याची मदत राजकीय यशासाठी घेणे योग्य नाही, असे संबंधितांस सुनवायला हवे होते. तसे काही केले असल्यास त्याची माहिती हे तज्ज्ञ आणि सर्वोच्च सत्ताधीशांनी जरूर द्यावी. त्याच 'लाडली बहना'चे भाषांतर शेजारील महाराष्ट्रात सुरू होईल. त्यासाठी वर्षास किमान ४६ हजार कोटी रु. लागतील. देशातील सर्वाधिक श्रीमंत राज्याच्या तिजोरीत लाखभर कोटी रुपयांची तूट आहे. त्यात आता हा ४६ हजार कोटी रुपयांचा खड्डा. 'राज्यांनी परकीय गुंतवणुकीसाठी प्रयत्न करावेत' असा सल्ला देणाऱ्या निती आयोगाने हा खड्डा मुळातच खणला जाऊ नये, यासाठी महाराष्ट्रास काही सांगितले काय? ताजा अर्थसंकल्प बिहार आणि आंध्र प्रदेश या राज्यांवर केंद्रीय खैरात करताना दिसतो. या राज्यांतील २८ खासदारांच्या पाठिंब्यावर केंद्र सरकार तगून असल्याने देशासमोरील आर्थिक आव्हानांपेक्षा राजकीय स्थैर्याची गरज अधिक महत्त्वाची असते, हे वास्तव त्यातून दिसते. पण अर्थसंकल्पातील या खैरातीवरही निती आयोगातील तज्ज्ञांनी काही मत व्यक्त केल्याचे दिसत नाही.विकासाची सुरुवात तळापासून व्हावी या हेतूने विद्यामान सरकारने आधीचा 'नियोजन आयोग' बरखास्त करून 'निती आयोग' आणला. पण त्यामुळे नाव आणि नवे सल्लागार वगळता नक्की काय बदलले? तेव्हा हे वास्तव बदलण्यासाठी आवश्यक आर्थिक सुधारणा रेटल्या जाणार नसतील तर अर्थतज्ज्ञांचे हे स्वप्नरंजन केवळ पॉवरपॉइंटी पोपटपंची ठरते.

# जात-वर्ग जाणिवेचा क्रांतिकारी साहित्यिक : अण्णा भाऊ साठे



प्रतिकाराचे दुसरे नाव संघर्ष होय. अण्णा भाऊ साठे यांचे संपूर्ण आयुष्य संघर्षात गेले. वाटेगाव ते मॉस्कोपर्यंतचा प्रवास हा त्यांच्या संघर्षाचा पुरावाच होय. अण्णाभाऊंचा जन्म ज्या सातारा–सांगली–वाटेगाव परिसरात झाला त्या भागात अनेक क्रांतिकारकांनी जन्म घेतला होता. एखाद्या विचारप्रणालीचा स्वीकार हा बहुधा त्या व्यक्तीच्या पार्श्वभूमीवर अवलंबून असतो. अण्णाभाऊंना भाकरीचा प्रश्न महत्त्वाचा वाटला. त्या प्रश्नाच्या अनुषंगाने येणाऱ्या कामाचे महत्त्व सांगणाऱ्या मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा परिचय त्यांना झाला आणि त्यातूनच ते मार्क्सवादाकडे वळले. त्यामुळे त्यांना जात जाणिवेबरोबरच वर्गजाणीवही होऊ लागली. जात आणि वर्ग जाणिवा हेच अण्णाभाऊंच्या साहित्याचे प्रयोजन झाले. शेवटी या दोन्ही जाणिवा मानवी प्रतिष्ठा व मानवमुक्तीचा संदेश देतात. मार्क्सवादाची ओळख अण्णाभाऊंना सर्वप्रथम रेठरे यात्रेत क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या भाषणामुळे झाली. जन्मापासून जातीयतेचे चटके त्यांनी सोसलेले होते. कामगार हा केवळ एक वर्ग नसून कामगारांचीही एक जात असते, याचा त्यांना अनुभव मोरगाबच्या गिरणीत काम करत असताना आला. त्यांची नेमणूक त्रासणखान्यात झाली होती. त्यांना तुटलेले धागे पुन्हा जोडावे लागत व धागे तोंडातली थुंकी लावून जोडावे लागत. तेथील कामगारांना अण्णाभाऊंची जात माहीत झाली आणि याच्या थुंकीने बाटलेल्या धाग्याला आम्ही हात लावणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली. अण्णाभाऊंनी तेथील काम सोडले. हीच जातीयतेची जाणीव त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून मांडून, सामाजिक आंदोलनाची रूपरेषा निर्माण केली.समाज परिवर्तनासाठी त्यांनी साहित्य हे माध्यम निवडले. अण्णाभाऊंच्या साहित्याचे सार प्र. के. अत्रे यांनी मार्मिक शब्दांत सांगितले आहे– 'अण्णाभाऊंचे साहित्य म्हणजे जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांचे साहित्य', असे सार्थ वर्णन त्यांनी केले आहे. मात्र तत्कालीन साहित्य निकषांनुसार अण्णाभाऊंचे साहित्य हे साहित्य मानले जात नव्हते. अण्णा भाऊ रशियन साहित्यिक मॅक्झिम गॉर्की यांचे वाक्य उद्धृत करतात– 'जो साहित्यिक जनतेची कदर करत नाही, त्या साहित्यिकाची कदर जनताही करत नाही.' अण्णाभाऊंनी विविध साहित्यप्रकार हाताळले. त्यात ३५ कादंबऱ्या, आठ पटकथा, १५ स्फुट कथा, एक प्रवासवर्णन, तीन नाटके, १२ उपहासात्मक लेख, १४ लोकनाट्ये, १० पोवाडे एवढी मोठी साहित्यसंपदा निर्माण केली. त्यावेळी एक वाद सुरू होता– 'कलेसाठी कला की जीवनासाठी कला'. अण्णाभाऊंनी जीवनासाठी कला या अनुषंगाने आपली साहित्यसंपदा निर्माण केली. तसेच समाजातील वंचित, दीन दलित, कष्टकरी, स्त्रिया, भटके यांच्या व्यथा–वेदना साहित्यातून मांडल्या. त्यांच्या प्रत्येक कादंबरीचा, कथेचा, नाटकाचा, लोकनाट्याचा विषय हा समाजातील तळाची बंडखोर व्यक्ती होता. लोकनाट्याद्वारे त्यांनी कामगारांच्या श्रमाचा पुरस्कार करणारे आणि जमीनदारांच्या शोषणाचा धिक्कार करणारे तत्त्वज्ञान मांडले. अण्णांनी 'लालबावटा कलापथक' (१९४२) व इप्टा यांच्या माध्यमातून वर्गशोषण म्हणजेच जमीनदार, सावकार यांच्या शोषणाचे जाहीर प्रगटन केले. अण्णांच्या साहित्यातील सर्व व्यक्तिरेखा अन्यायाविरुद्ध लढतात. तसेच त्यांच्या कथांत दलितेतर व्यक्तिसुद्धा सामाजिक न्यायाच्या भूमिका घेताना दिसतात. उदा. विष्णुपंत कुलकर्णी (खुळंवाडी). अण्णाभाऊंच्या साहित्याबद्दल डॉ. एस. एस. भोसले म्हणतात की, 'फुले–आंबेडकरांचा वारसा घेऊन उभे राहिलेले व प्रस्थापित मराठी साहित्य संस्कृतीची परंपरा नाकारणारे अण्णाभाऊ हे पहिले दलित बंडखोर लेखक आहेत.'कोणत्याही कलावंताच्या कलेची समीक्षा करत असताना आपण त्यांचे सामाजिक संदर्भ टाळू शकत नाही व टाळायचे नसतात. अण्णाभाऊ जात–वर्गीय हितसंबंधाच्या पूर्ण विरोधी आहेत. प्रखर बुद्धिवाद, समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व, समाजवादी विचार यांच्या वैचारिक साधनेवर अण्णा भाऊंचा वाङ्मयीन दृष्टिकोन उभा आहे. लोकशाहीर म्हणून त्यांनी 'लालबावटा कलापथका'सह संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. या कलापथकासाठी त्यांनी लोकनाट्य लावण्या, पोवाडे असे वाङ्मय प्रकार हाताळले. 'अकलेची गोष्ट', 'शेटजीचं इलेक्शन' इत्यादी लोकनाट्यांद्वारे ते लोकांपर्यंत पोहोचले. कार्ल मार्क्सच्या इतिहासाच्या उत्क्रांतीची संकल्पना समजावून सांगणे व सामाजिक बदलाच्या प्रक्रियेमधील कामगारांचे स्थान त्यांच्या मनावर ठसवणे हा या लोकनाट्यांचा मुख्य उद्देश होता. या कलापथकाच्या माध्यमातून त्यांनी विदर्भ व खानदेशात कम्युनिस्ट पक्षाचा प्रचार व प्रसार केला. १५ ऑगस्ट १९४७ला देशाला स्वातंत्र्य मिळाले. काँग्रेस पक्षाने देशभर उत्सव साजरा केला. परंतु अण्णा मात्र उदास झाले होते. ते विचार करू लागले देश स्वातंत्र्य झाला म्हणजे काय झाले? स्वातंत्र्य कुणाला मिळाले? शेठजींना, भटजींना, भांडवलदारांना, कारखानदारांना, अधिकाऱ्यांना की गरीब जनतेला? जे स्वातंत्र्य भुकेकंगाल जनतेचा विचार करत नसेल ते काय कामाचे? १६ ऑगस्टला चिरागनगरमधील कामगारांना एकत्र करून मुंबईच्या कचेरीवर मोर्चा काढला तेव्हा उपस्थित जनतेतून आवाज आला, 'इन्कलाब जिंदाबाद! लाल सलाम जिंदाबाद! जनता अमर रहे, गरीबों का राज आना चाहिए. इस देश की जनता भूखी है। ये आजादी झूठी है। ये आजादी झुठी हैं।' मोरारजी देसाई यांनी 'लोकमंत्री' या लोकनाट्याच्या प्रयोगावर बंदी घातली तेव्हा अण्णाभाऊ भूमिगत होऊन कार्यक्रम सादर करत. अतिशय जिद्दीने अण्णांनी प्रबोधनाची परंपरा कायम ठेवली. १९५६ला महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली. कम्युनिस्ट पार्टी या लढ्यात संपूर्ण ताकदीनिशी उतरली. लालबावट्याचे पुन्हा पुनरुज्जीवन करण्याचे पार्टीने ठरवले आणि दत्ता गव्हाणकर व अण्णाभाऊंनी पुन्हा कलापथकाची बांधणी केली आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत कलापथकाच्या कार्यक्रमात सुरुवात केली. अण्णाभाऊंच्या कलापथकांनी 'माझी मुंबई' हे लोकनाट्य तयार केले. 'संयुक्त महाराष्ट्रा'ची चळवळ महाराष्ट्रात उभी करण्यात अण्णा भाऊ साठे व त्यांच्या कलापथकाचा सिंहाचा वाटा होता. अण्णाभाऊंच्या कलापथकावर बंदी घालण्यात येऊन अण्णांना अमरावतीच्या तुरुंगात ठेवण्यात आले आणि तिथेच त्यांनी माझी मौना गावावर राहिली, माझ्या जीवाची होतीया काहिली ही प्रसिद्ध लावणी तयार केली. १९५८ च्या निवडणुकीत त्यांनी पुन्हा प्रचाराचे कार्य सुरू केले. संयुक्त महाराष्ट्र समितीला मोठ्या प्रमाणात यश मिळाले. १९५६ नंतरचे अण्णा भाऊंचे साहित्य हे परिवर्तनवादी व प्रबोधनवादी आहे. अण्णा भाऊ साठे १९४६ पासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक आंदोलनाने प्रभावित झाले होते. त्यांनी त्यांच्या एका वगातही लिहिले होते. अण्णाभाऊ मार्क्सवादी विचारांनी झपाटलेले होते, हे निर्विवाद सत्य असले तरी त्यांनी मार्क्सवादाची चिकित्सा भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात करणे सुरू केले होते. मार्क्सवाद जगाचा अभ्यास करताना कामगारांच्या शोषणाचा, त्यांच्या पिळवणुकीचा विचार मांडतो. परंतु भारतीय दलितवर्ग हा आर्थिक शोषणाचा बळी आहे. तसा तो तेथील मनुवादी जातीय समाजरचनेने निर्माण केलेल्या सामाजिक शोषणाचाही बळी आहे. याचे भान अण्णा भाऊंना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक लढ्यांनी दिले. 'फकिरा' ही कादंबरी त्यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला' अर्पण केली. कार्ल मार्क्सने कामगारांच्या हातात क्रांतीच्या मशाली दिल्या तर डॉ. आंबेडकरांनी दलितांना आंदोलनकारी केले. अण्णाभाऊंनी लिहिलेल्या 'सापळा', 'बुद्धाची शपथ', 'उपकाराची फेड' व 'वळण' या कादंबऱ्या आंबेडकरी विचारांनी प्रभावित होऊन लिहिलेल्या आहेत. अण्णा भाऊ साठे हे खऱ्या अर्थाने दलित साहित्याचे प्रवर्तक ठरतात. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेबांचा विचार शेवटच्या घटकापर्यंत नेण्याचे काम त्यांनी केले. अण्णाभाऊंच्या साहित्यात कधीही जातीय संघर्ष दिसून येत नाही. सत्य व असत्य या प्रवृत्तीचा संघर्ष दिसून येतो.

अण्णाभाऊ तत्कालीन सर्व साहित्यप्रकारांच्या विरोधी व विद्रोही होते. प्रस्थापित सर्व साहित्याच्या चौकटीलाच त्यांनी आव्हान दिले. त्यांच्या साहित्याचे एकूण प्रयोजन सामान्यातल्या सामान्य माणसाला क्रांतीप्रवण करणे व या देशातील जात–वर्गाला मूठमाती देणे होय. तत्कालीन व्यवस्थेतील मार्क्सवादी व आंबेडकरवादी यांनी त्यांना पूर्ण स्वीकारले नाही. त्यांच्या अनुयायांनी अण्णाभाऊंना व्यक्ती व त्यांचा नेता म्हणून स्वीकारले पण त्यांच्या विचारांचा वारसा मात्र स्वीकारला नाही. सामाजिक वास्तवाची प्रखर जाणीव असलेल्या या क्रांतिकारी साहित्यिकाला विनम्र अभिवादन

**लेखक उदगीर येथील शिवाजी महाविद्यालयात राज्यशास्त्राचे सहयोगी प्राध्यापक आहेत**

# माजलगाव विधानसभा निवडणुक रिंगणात

माजलगाव पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील धडाडीचे ओबीसी नेता म्हणून ओळख असलेले दत्ता विसवळे यांची माजलगाव मतदार संघात सध्या विधानसभेसाठी जोरदार चर्चा चालू असून येत्या काळात ते आमदार दिसतील असे सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे व प्रस्थापितासाठी नव्हे तर लोकशाहीत सर्वांना मुभा असते. याचे भान प्रस्थापितांना राहिले नाही. राजकीय मक्तेदारी मोडीत काढावी लागेल गेल्या लोकसभेत निवडणुकीत संधी हुकली ती आता हुकु द्यायची नाही. संधी दार ठोठावत असते हे सत्य असले तरी आज स्पर्धेच्या युगात तर दार तोडून संधी मिळवावी लागते. प्रसंगी घुसखोरावर मात करून गरुड भरारी घ्यावी लागते. माजलगाव मतदार संघाचा पल्ला गाठण्यासाठी दत्ता विसवळे यांची पुरेपूर तयारी झाली आहे. हट्ट करणं वाईट असतं पण कांही वेळी कांही हट्ट गुणकारी ठरतात. राजकीय दिशा ओळखून दूर दृष्टीने निर्णय घेऊन सकारात्मक पाऊल उचलण्याच्या निष्ठांतपणा त्यांच्या व्यक्तिमत्वात आहे. लोकांना गृहीत धरून एकाधिकारशाहीच राजकारण करणाऱ्यांना शह देत लोकांच्या मनातले प्रश्न ओळखुन लोक भावना हाताळून निर्णय घेत लक्ष गाठण्यासाठी वाटचाल चालू आहे. निस्वार्थ भावनेतून कर्तव्य निभावत जन प्रेम उभा केल आहे. जनसेवा आणि थेट संपर्क ही अत्यंत साधी रणनिती ठेवून कायम जनतेची नाळ जोडली आहे.समस्या निर्मूलनासाठी यश अपयशाची परवा न करता लोकशाही मार्गाने संघर्ष चालू आहे.



समाजकारण आणि राजकारणाच्या माध्यमातून केलेली सेवा वेळोवेळी साधलेला संवाद व संपर्क यामुळे निर्माण झालेली लोकशक्ती प्रचलित प्रस्थापितांना गारद करण्यासाठी माजलगाव सज्ज आहे. राजकीय मक्तेदारी व दहशतीखाली दबलेला काही मतदार वर्ग खुल्या मनाने बोलत नसला तरी निवडणुकीच्या रंणधूमाळीत भय मुक्तीसाठी दत्ता विसावळे यांना बिनधास्त मतदान करेल. आज. घडीची राजकीय परिस्थिती लक्षात घेता दता विसावळे यांच्या जिद्दीला माजलगाव यांची साथ निश्चित लाभू शकते. हे मात्र खरे आहे

# लोकमान्य टिळक मतदार जनजागृती; शासनाच्या शैक्षणिक सप्ताहाचा उपक्रम



वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोकमान्य टिळक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आणि तहसील कार्यालय आणि शासनाच्या शैक्षणिक सप्ताहाचे औचित्य साधून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर के एम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नव मतदार जनजागृती अभियान चा शुभारंभ महाविद्यालयात मोठ्या उत्साहात करण्यात आला यावेळी झालेल्या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर भालचंद्र कुलकर्णी हे होते यावेळी वडवणी तहसील कार्यालयाचे निवडणूक निर्णय अधिकारी शेख रऊफ त्याचबरोबर श्री शिवकुमार टिकुळे हे होते यावेळी व्यासपीठावर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य गोपीचंद उर्फ तिलोकचंद घायतिडक हे होते प्रारंभी प्रास्ताविक भाषणातून मतदार साक्षरता मंडळाचे समन्वयक प्रा डॉ अशोक खेत्री यांनी नव मतदार नोंदणी साठी विविध उपक्रमासह प्रत्यक्ष नाव नोंदणी करण्याचा तहसील कार्यालयाने आखून दिलेला कार्यक्रम यावेळी विशद केला.

याप्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे शेख रऊफ यांनी भारतीय लोकशाही मजबूत आणि जिवंत आहे ती इथल्या युवक युतीमुळे नवमदारांमध्ये जागृती बरोबर या देशाचे संविधान आणि मूल्य या विचारांची पेरणी करण्यासाठी सारे मिळून आता कटिबद्ध होण्याची गरज आहे त्यांनी नव मतदार जनजागृती बरोबरच नोंदणी दुरुस्ती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले अध्यक्ष समारोप करताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य भालचंद्र कुलकर्णी यांनी भारतीय लोकशाही आणि मूल्य यांच्या मजबुतीसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग आज कटिबद्ध आहे या दृष्टीने युवा शक्तीने मतदार नाव नोंदणी अभियानात स्वतः पुढाकार घेण्याची गरज आहे यावेळी त्यांनी महाविद्यालयात सुरू असलेल्या शैक्षणिक सप्ताहाचा प्रेरणादायी शब्दांमध्ये आढावा घेतल यावेळी महाविद्यालयात नव मतदार युवक किमती मधून म्बेसिडर यांची तहसील कार्यालयाने आखून दिलेल्या नियमावलीत निवड करण्यात आली यावेळी या विद्यार्थी युवा किवतींचा पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

उपस्थितांचे आभार उपस्थितांचे आभार प्रा गोपाळ मस्के यांनी मानले या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी मोठा प्रतिसाद दिला

पान सहा वरून

**जाहिरातींच्या तक्रारींसाठी...**

प्रसारमाध्यमांमध्ये दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रकाशित किंवा प्रदर्शित करण्याच्या पैलूंवर सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच प्रकाश टाकला होता. दरम्यान, 'आयुष मंत्रालयाने प्राप्त झालेल्या तक्रारींसाठी एक डॅशबोर्ड तयार करणे आवश्यक आहे, जेणेकरून ही माहिती सार्वजनिक होईल, असे खंडपीठाने म्हटले आहे.अनेक राज्यांमध्ये दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींबाबत तक्रारी प्राप्त होतात, परंतु या तक्रारी इतर राज्यांना पाठवण्यात येतात, कारण त्या संबंधित उत्पादनाची निर्मिती त्या राज्यांत होते, असे सुनावणीवेळी न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. त्यावर खंडपीठाने नमूद केले की, ग्राहकांनी नोंदवलेल्या तक्रारींचा आकडा हा पूर्वी २ हजार ५०० हून अधिक होता, जो आता केवळ १३० च्या आसपास आला आहे. यातील मुख्य कारण म्हणजे अशा तक्रारी हाताळण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणाच उपलब्ध नाही. संबंधित मंत्रालयाने या समस्येकडे लक्ष देऊन दोन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

**अरुण गवळीला पुन्हा तुरुंगात...**

घोषित केलं. यानंतर पोलिसांनी हत्येचा तपास सुरु केला. मात्र पोलिसांना सुगावा लागत नव्हता. पोलीस मात्र कसून चौकशी करत होते. त्यावेळी त्यांना समजलं की या हत्येचे धागेदोरे एका आमदारापर्यंत पोहचले आहेत. अर्थातच तो होता डॉन अरुण गवळी. त्यामुळे याच प्रकरणात अरुण गवळीला अटक झाली. कमलाकार जामसंडेकर यांच्या हत्येनंतर जवळपास वर्षभराने ही बाब उघड झाली होती की ही सुपारी अरुण गवळीने दिली आहे. अरुण गवळी त्यावेळी भायखळा मतदारसंघाचा आमदार होता.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# वर्गमित्रांची पून्हा भरली शाळा!

## जुन्या आठवणी १९८६ च्या दहावी बॅचचे विद्यार्थी जमले एकत्र

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

एके काळी बीड जिल्ह्यात नावा-रूपास असलेली जिल्हा परिषद हायस्कूल केज येथील १९८६ दहावी च्या वर्गाच्या माजी विद्यार्थी -विद्यार्थिनी यांनी दिनांक ,२७ व२८ जुलै रोजी मोठ्या उत्साहात आनंदात गेट-टुगेदर साजरे केले, वास्तविक पाहता दहावीनंतर एकत्र येणे व आपापले सुखदुःख आपल्या बाल मित्रांना सांगणे यात खूप आनंद आहे. त्यावेळच्या दहावी वर्गातील विद्यार्थी प्रवीण देशपांडे यांच्या संकल्पनेतून एक व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आला यामध्ये दहावी वर्गातील विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचे काम केले. जस जसे व्हाट्सअप ग्रुप मध्ये संख्या वाढू लागली . तस तसे नवनवीन जुने मित्र ग्रुप मध्ये ॲड झाले नंतर सर्वानुमते कानडी माळी येथे रामकिशन राऊत यांच्या शेतात उत्साहाने पहिले गेट-टुगेदर संपन्न झाले यावेळी त्यांच्या वर्ग शिक्षकांना आमंत्रीण करण्यात आले नंतर. शिक्षकाच्या जुन्या आठवणींना उजाळा देत पहिले गेट-टुगेदर पार पाडले. ग्रुप सभासद संख्या वाढत गेली. नंतर दुसरे गेट-टुगेदर वर्गमित्र राजू पांगळ यांच्या फार्म हाऊस वर कुर्डूवाडी येथे आनंदात पार पडले.नंतर वेगळे काहीतरी करावे म्हणून तिसरे गेट-टुगेदर लोणावळा येथे करायचे ठरवले. लोणावळा येथे चार बंगले घेऊन या ठिकाणी विविध ठिकाणाहून आलेले वर्गमित्र एकत्र जमले यामध्ये प्राध्यापक, प्रोफेसर, सध्या मोठ मोठ्या हुद्द्यावर असणारे मित्र, व्यवसायिक, शिक्षक हे सर्व स्वतःला विसरून फक्त आपण विद्यार्थी आहोत असे या गेट-टुगेदर कडे पाहत होते कोणताही मनात भेदभाव नव्हता. संगीताच्या मैफिलीत, गाण्याच्या सुरेल आवाजात, नृत्य करत विविध पदार्थांचा आस्वाद घेत पिकनिक पॉईंट पाहिले. दुसऱ्या दिवशी लोणावळा येथील नारायणी धाम, स्वामी समर्थ मंदिर, एकवीरा देवी, आळंदी करत केज येथे समारोप केला .



लोणावळा गेट-टुगेदर ला मनीषा आनंदगावकर, राजेश पांगाळ, प्रविण देशपांडे, सरोज इंगळे धनंजय धाट, राजेंद्र शिंदे , महादेव दळवे,देवा पेंढारे, गोविंद जाजू, मीना जाजू व जिजाजी, मंजुषा डोंगरे, वंदना डोंगरे,पांडुरंग पारेकर

अरुणा बहिर,शोभा अंधारे, जगदीश लहूरीकर,जगन्नाथ मस्के,सुहास घाट, दिनकर नाईकवाडे,रामकिसन राऊत, शालन चौभारकर,दत्ता चाटे,दिलीप साखरे,धनराज अंधारे, राजाभाऊ काळेगोरे, मेनकुदळे धनंजय, अनिल कवटेकर,मनोज दरक,दिनकर चाटे इत्यादी उपस्थित होते. मैत्री दिनाच्या पूर्वसंध्येला पार पडलेल्या गेट टुगेदर कार्यक्रम यशस्वी करण्यास राजेश पांगांळ यांच्या अथक परिश्रमातून व प्रवीण देशपांडे, मनीषा आनंदगावकर यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली, सर्व मित्र मैत्रिणीच्या सहकार्याने हे गेट-टुगेदर अतिशय उस्हात व खेळीमेळ्याच्या वातावरणात पार पडले.

# शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक मंथन

## कौतुकास्पद : प्रा.कुडकेंनी विद्यार्थी उभेही केले



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहिद भगतसिंग विद्यालयातील प्राध्यापक शिवमुर्ती कुडके यांनी आपल्या २९ वर्षाच्या कार्यकाळामध्ये विद्यालयात केवळ विद्यार्थीच घडवले नाही तर अनेक गोरगरिब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करत उभे करण्याचे कामही केले. शिक्षक त्यामुळे त्यांच्यासारखा शिक्षक संस्थेला पुन्हा मिळणार नाही असे गौरवोद्गार संस्थेच्या अध्यक्षा प्रा.सुशिला मोराळे यांनी काढले. शिवमुर्ती कुडके यांच्या एकंदरीत कार्यकाळाविषयी आणि शिक्षक सेवेविषयी आ.विक्रम काळे, माजीमंत्री सुरेश नवले, माजी आ.राजेंद्र जगताप, भाशिप्रचे प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह आदी मान्यवरांनी कौतूक करत त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रा.सुशिला मोराळे यांनी आपल्या भाषणामध्ये शिवमुर्ती कुडके यांना मी बोलावून घेत नौकरी दिल्याचे सांगत असतांनाच अत्यंत हुशार आणि क्रियाशील चळवळीचा कार्यकर्ता म्हणून मी शिवमुर्तीला ओळखत होते. त्याचे राजकीय विचार काय आहेत. याकडे मी पाहिले नाही. केवळ त्याचा सांघीक आणि क्रियाशीलता हा गुण विद्यार्थ्यांसाठी महत्वाचा आहे यामुळेच त्याला संस्थेवर घेतले. त्यांनी देखील आपल्या सेवाकार्यकाळामध्ये संस्थेची प्रामाणिक सेवा केली. अनेक विद्यार्थी घडवले. त्यामुळे संस्थेलाही नावलौकीक मिळण्यास मदत झाली असे त्या म्हणाल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.सौ.खोसे यांनी केले. प्रास्ताविक प्रा.गाडेकर यांनी केले. कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रातील मान्यवर,मुख्याध्यापक, पत्रकार, कुडके यांचे कुटुंबिय, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# त्या गुत्तेदाराचा परवाना रद्द करा

## आदर्श तरकसे : जिल्हा प्रशासनास दिले निवेदन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील पंचशील नगर प्रभाग क्रमांक २२, पद्मपाणि प्रतिष्ठान कार्यालयासमोरील १५ फुटी रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट करण्यात आले आहे. थोड्याच दिवसात रस्त्याला भेगा पडून रस्ता खचू लागला आहे. हा रस्ता पुन्हा नव्याने बनविण्यात यावा तसेच संबंधित अभियंत्याला निलंबित करून रस्ता बनविणाऱ्या गुत्तेदाराचा परवाना रद्द करण्यात यावा. अशा मागण्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर उपाध्यक्ष आदर्श तरकसे यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड शहरातील प्रभाग क्रमांक २२ मध्ये पंचशील नगर येथे असलेल्या पद्मपाणि प्रतिष्ठान कार्यालयासमोरील १५ फुटी रुंद रस्त्याचे कॉंक्रिटीकरण नुकतेच काही दिवसापूर्वी करण्यात आले. कॉंक्रिटीकरण करताना येथे लोखंडी सळ्या टाकण्यात आल्या नाहीत. सदरील कॉंक्रिटीकरण हे अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याने काही दिवसातच हा रस्ता तडे जाऊन खचू लागला आहे. विशेष म्हणजे यापूर्वीही जेव्हा कॉंक्रिटीकरण करण्यात आले होते तेव्हाही अशाच पद्धतीने काही दिवसातच हा रस्ता भेगा पडून खचला होता. तशाच अवस्थेत तो अनेक वर्षे ठेवण्यात आला आणि आता कुठे काही दिवसांपूर्वी पुन्हा या रस्त्याचे नव्याने कॉंक्रिटीकरण करण्यात आले. मात्र यावेळीही गेल्या वेळेस सारखेच पुन्हा या रस्त्याला कॉंक्रिटीकरणानंतर काही दिवसातच भेगा पडून तळे जाऊ लागले आहे. हा रस्ता निकृष्ट केल्याने संबंधित गुत्तेदार व अभियंत्यांवर कायदेशीर कडक कारवाई करण्यात यावी. संबंधित अभियंत्याला निलंबित करून रस्ता बनवणाऱ्या गुत्तेदाराचा परवाना रद्द करण्यात यावा तसेच हा रस्ता पुन्हा एकदा नव्याने लोखंडी सळ्या टाकून बनविण्यात यावा. अशा मागण्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर उपाध्यक्ष आदर्श तर कसे यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना दिलेल्या निवेदनातून केल्या आहेत.

# उमेदवारांना सहा महिन्याचा वाढीव कालावधी

## निर्णय : विद्यार्थ्यांना मिळाला दिलासा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात सध्या सुरु असलेल्या सन २०२४-२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी ( अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन सदर शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायीक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासुन सहा महिन्यांचा कालावधी देण्यात येत आहे. सदर सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये संबंधित उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द होतील व त्याबाबत संबंधित उमेदवार जबाबदार राहतील. याची खबरदारी घ्यावी त्याप्रमाणे लवकरात लवकर जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन उपायुक्त तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य एस आर मकरंद यांनी केले आहे

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाने दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजी विशेष अधिवेशन घेऊन महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ (एसईबीसी आरक्षण अधिनियम २०२४) एकमताने संमत केला आहे. दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ पासून सदर अधिनियम अंमलात आला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ५ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी राज्यातील शैक्षणिक संस्थामधील प्रवेशामध्ये तसेच राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय व निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १० % टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

राज्यात सध्या विविध महाविद्यालयांत सुरु असलेल्या शैक्षणिक संस्थामधील प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यास उमेदवारांना अडचणी येत असल्याबाबत काही लोकप्रतिनिधी तसेच उमेदवारांकडून निवेदने प्राप्त झालेली आहेत. त्यानुसार शासनाने ही बाब लक्षात घेऊन सहा महिन्याचा कालावधी वाढविला आहे.


# नोकरीच्या कार्यकाळात उल्लेखनिय कार्य!

## ऋणानुबंध :प्रवीण दीक्षित झाले सेवानिवृत्त

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील परळी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात उपकार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असणारे प्रवीण बसंतप्रसाद दीक्षित ३३ वर्षाच्या सेवेनंतर दि ३१ जुलै २०२४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

प्रवीण बसंतप्रसाद दीक्षित हे परळी वीज निर्मिती केंद्रात कनिष्ठ अभियंता म्हणून रुजू झाले होते. सध्या त्यांच्याकडे माहिती अधिकार विभाग होता. धारूर तालुक्यातील असलेले दीक्षित दि २० जुलै १९९१ रोजी वीज निर्मिती केंद्रात नोकरीला लागले. त्यांनी आतापर्यंत संच क्रमांक एक ते आठ मध्ये तसेच चंद्रपूर वीज निर्मिती केंद्रातही जलसंधारण विभाग ,बाष्पक विभाग, कोळसा हाताळणी, राख हाताळणी ,तसेच संचलन सेवा, माहिती अधिकार विभाग आदी ठिकाणी उत्कृष्टरित्या काम केले आहे. दि ३१ जुलै २०२४ रोजी परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रशासकीय इमारतीत त्यांचा व इतर कर्मचाऱ्यांचा मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांच्या हस्ते सत्कार होणार आहे. त्यांनी त्यांचे काम करून इतर वेळात प्रशाकीय इमारती समोरील जिजाऊ उद्यानाची देखील देखभाल केली.



त्यांचा मनमिळाऊ स्वभाव असल्याने ते प्रत्येकाच्या स्मरणात कायम राहतील. सेवानिवृत्तीनंतरही भविष्यात त्यांना आरोग्यमय व सुख समाधानाचे जीवन मिळावे असी मंगल कामना करण्यात येत आहेत सदिच्छा देण्यात येत आहेत दीक्षित यांना एक मुलगा व एक मुलगी आहे.मुलगा साहिल हा बी.ई.एम.टेक.उत्तीर्ण असून सध्या तो हैदराबाद येथे कार्यरत आहे. तसेच मुलगी एम.टेक.झाली असून मुंबई येथे कार्यरत आहे.

# हृदय मंदीरात हरीला साठवावे लागेल

## पांडूरंग महाराज घुले : परळीत सावता महाराज समाधी सोहळा

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

जन्म आणि मृत्यूची येरझार थांबवून मुक्त व्हायचे असेल तर आपल्या हृदय मंदिरात हरीला साठवले पाहिजे.वास्तविक हरिहर प्रत्येकाच्या आत मध्ये विराजमान असतोच परंतु स्वतः मधील हरी दिसणे हे सर्वसामान्य व्यक्तीला शक्य नसते . त्यासाठी सद्गुरूंची कृपा व्हावी लागते तेव्हाच आपल्यातील असलेल्या हरीचे दिव्यदृष्टीने दर्शन घडत असते असे प्रतिपादन देऊ येतील गाथा मंदिराचे अध्यक्ष ह भ प पांडुरंग महाराज घुले यांनी परळी वैजनाथ येथे चालू असलेल्या संत श्रेष्ठ सावता महाराज यांच्या समाधी सोहळ्यानिमित्त आयोजित सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशीचे कीर्तन सेवेच्या प्रसंगी प्रतिपादन केले. संत शिरोमणी सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी येथील संत सावता महाराज मंदिरात



रविवार दि.२८ जुलै पासुन ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला.यानिमीत्त रात्री ७ ते १० या वेळेत ह.भ.प.पांडुरंग महाराज घुले यांचे हरिकीर्तन पार पडले.

अखंड हरिनाम सप्ताहात गुरुवार दि.१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वा.रक्तदान शिबीर व समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असुन दि.३ ऑगस्ट रोजी दुपारी १ वा. संत सावतामाळी मंदिर येथुन सावता महाराज पालखी सोहळा निघणार आहे. मंगल कलश, ध्वज पताका, टाळ,विणा,मृंदग,बॅन्ड लेझीमच्या निनादात दिंडी सोहळा निघणार आहे.

## कारवाई डॉ. किशोर रत्नपारखीच्या चौकशीसाठी समिती गठीत

# रुग्णांशी बेशिस्त वर्तन डॉक्टरला भोवले!

माजलगाव पुण्यभूमी प्रतिनिधी

ग्रामीण रुग्णालय, माजलगाव येथे कार्यरत असलेले डॉ. किशोर रत्नपारखी यांनी अशोक भिमराव घडसिंगे यांना एकेरीवर येऊन आरेरावीचे भाषा वापरत शासकिय कामात्त अडथळा केल्याबाबतचा गुन्हा नोदंवण्याची धमकी देत जातीवाचक भाषा करून एकेरी शब्दात रुग्ण विर व संबंधितांना अपमानित केले होते त्याची तक्रार संबधिताने किशोर रत्नपारखी यांचे विरुध्य कार्यवाही करणे बाबत मा. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचा ई-मेल दिनांक २९.०७.२०२४ रोजी पाठवला होता याची दखल घेत जिल्हा शैल्य चिकित्सक ( सि एस ) यांनी या तक्रारीची दखल घेत त्री सदस्य समिती स्थापन करून या समितीचा अहवाल मागवला आहे.

मागील काही दिवसापासून माजलगाव ग्रामीण रुग्णालयातील काही जातिवादी मानसिकतेत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांमुळे माजलगाव ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना खूप मोठ्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. याबाबत कित्येक वर्तमानपत्रातही बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत.



या अगोदर पण गरोदर स्त्रियांना बेड उपलब्ध न करता जमिनीवर (फरशी )झोपवले जाते .लाखो रुपये खर्चून कोविड सेंटरच्या नावाखाली वीस ते बावीस गरज नसलेले बेड लावण्यात आलेले आहेत मात्र डिलेवरीसाठी गरोदर मातांना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत असते, या रुग्णालयात ना एक्स-रे मशीन सुरू आहे ना वेळीच कुठली सुख सुविधा उपलब्ध आहे अशा वेगवेगळ्या समस्यांनी ग्रासलेल्या माजलगाव ग्रामीण रुग्णालयांना डॉ. किशोर रत्नपारखी सारख्या डॉक्टरांनी जनु बदनाम करण्याचा विडाच उचलला आहे त्यामुळे त्यांच्यावर योग्य वेळी योग्य कारवाई होणे अपेक्षित आहे असं रुग्णालयात येणाऱ्या जाणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकातून बोलले जात आहे.

वर्तमानपत्रातील बातम्या मेल व अर्जाद्वारे आलेल्या तक्रारीची दखल जिल्हा शल्य शैल्य चिकित्सक यांनी तात्काळ दखल घेऊन आपली कर्तव्यदक्षता दाखवली आहे आणि तात्काळ समिती नेमून जी वस्तुस्थिती असेल त्याबद्दल अहवाल लवकरात लवकर सादर करण्याच्या सूचना त्या समितीला केल्या आहेत .त्या मुळे पुन्हा एकदा तक्रार छोटी असो की मोठी त्यावर तात्काळ क्शन घेणाऱ्या कर्तव्यदक्ष माजी जिल्हा शैल्य चिकित्सक डॉ. सुरेश साबळे यांची आज आठवण झाली.

# केज नगर पंचायतमध्ये शुकशुकाट !

## प्रतिक्षा : कोण होणार नविन नगराध्यक्ष ?




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

नेहमीच गजबजलेल्या केज शहरातील नगरपंचायत कार्यालयात आणि कार्यालयाच्या आवारात सध्या शुकशुकाट दिसतो आहे. सध्याच्या नगराध्यक्षांचा कार्यकाल आता केवळ दोनच आठवड्यांचा राहिला आहे तर नवीन नगराध्यक्ष कोण होणार याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. या आठवड्यात नगराध्यक्षांचे आरक्षणाची सोडत मुंबईत होण्याची प्रतीक्षा आहे. केज शहरामध्ये तेव्हा झालेल्या नगरपंचायतीच्या निवडणुकी नंतर इनामदार,पाटील,आडसकर असी युती झाली होती आणि बनसोड ताई अध्यक्ष तर दांगट ताई उपाध्यक्ष झाल्या होत्या. ती आडीच वर्षाची टर्म आता संपत आली असून केवळ दोनच आठवडे बाकी आहेत. मग आता आरक्षण सुटणार आणि नवीन राजकीय समीकरण पुढे येणार असी चर्चा सध्या सुरू आहे. आता कोणाला संधी मिळणार यावर अनेक ठिकाणी राजकीय अभ्यासक खिस पाडताना दिसत आहेत. तर अनेकजण वेगवेगळ्या पद्धतीने तर्क वितर्क लावत आहेत परंतु यामुळे या कार्यालयाच्या आवारात मात्र सध्या शुकशुकाट पहायला मिळत आहे. आरक्षणानंतर मात्र पुन्हा या ठिकाणी गर्दी झालेली पहायला मिळेल.

**सुविचार** - समाधान शोधले, की तक्रारी आपोआप कमी होतात.


# पर्यावरणाशी खेळ आणि....!

काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात माळीणची दुर्घटना घडली होती. एक अख्खे गाव रात्रीतून इतिहासजमा झाले होते. दोन वर्षांपूर्वी कोकणातही आदिवासींच्या वस्तीवर दरड कोसळून अर्धी वस्ती गाडल्या गेली होती. उत्तरेकडील डोंगरी भागात तर भूस्खलनाच्या घटना नेहमीच घडत असतात. त्याच मालिकेतील; परंतु अधिक प्रलंयकारी दुर्घटना केरळमधील वायनाड जिल्ह्यात घडली आहे. वायनाडमधील मेपाडीच्या डोंगराळ भागात मंगळवारी पहाटेच्या सुमारास तीन वेळा भूस्खलन झाले. त्यात मोठ्या प्रमाणात खडक, मातीचा मलबा खाली आल्यामुळे जवळपास शंभरपेक्षा अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला. पहाटेच्या सुमारास ही घटना घडल्यामुळे परिसरातील गावकरी बेसावध होते, त्यांना काही कळण्यापूर्वीच प्रचंड प्रमाणात मातीचा मलबा त्यांना गिळंकृत करून गेला. अजूनही चारशेपेक्षा अधिक लोक बेपत्ता असल्याची बातमी आहे. विशेष म्हणजे वायनाडमधील मुंडक्काई, चुरमाला, अट्टामाला आणि नूलपुझा या ज्या चार गावांमध्ये भूस्खलनाने तांडव घातले आहे त्याच चार गावांमध्ये पाच वर्षांपूर्वी अतिवृष्टीमुळे भूस्खलन झाले होते, ज्यामध्ये १७ लोकांचा मृत्यू झाला होता, तर पाच जण बेपत्ता झाले होते. याहीवेळेस या भूस्खलनाचा सर्वाधिक फटका याच चार गावांना बसला. वायनाडमधून काबिनी नदी वाहते, या काबिनीची उपनदी म्हटल्या जाणारी मनंथवाडी ही डोंगराच्या शिखरावरून उगम पावते. भूस्खलनामुळे या नदीला पूर आल्याने मोठे नुकसान झाले आहे. एरवीही डोंगर उताराच्या भागात राहणाऱ्या लोकांना कायमच अशा आपत्तीचा धोका असतो; परंतु अलीकडील काळात अशा दुर्दैवी घटनांचे प्रमाण वाढल्याचे दिसते. त्यामागे केवळ नैसर्गिक प्रकोप हेच एक कारण निश्चितच नाही. तज्ज्ञांच्या मते गुरुत्वाकर्षणाच्या थेट प्रभावाने माती आणि खडकांमध्ये हालचाल होते आणि ते उतार भागातून खाली सरकू लागतात. त्यात कधी चिखलाचा प्रवाह निर्माण होतो तर कधी चिखल आणि दगडांचा प्रचंड मोठा प्रवाह वेगाने उताराकडे येतो. भूस्खलन ही नैसर्गिक आपत्ती असली तरी भूस्खलन होण्यामागे मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड हेदेखील एक महत्त्वाचे कारण असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. वनस्पती, झाडांची मुळे, माती, झुडुपे आणि इतर वनस्पती खडकांना बांधून ठेवतात आणि जमीन स्थिर ठेवण्यास मदत करतात. झाडांच्या मुळाशिवाय जमीन सरकण्याची शक्यता जास्त असते. वनस्पती, झाडे झुडपे नसल्यास मुसळधार पावसामुळे भूस्खलनदेखील होऊ शकते, केरळच्या दुर्घटनेत हेच झाले आहे. प्रचंड प्रमाणात आणि मर्यादित क्षेत्रात पडणारा पाऊसदेखील भूस्खलनासाठी कारणीभूत असतो, अशा परिस्थितीत भूस्खलनाचा धोका कमी करण्याचे काम झाडेच करीत असतात; परंतु अलीकडील काळात देशभर सर्वत्रच सार्वजनिक आणि खाजगी पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी प्रचंड प्रमाणात जंगलतोड होत असल्याने विशेषतः डोंगर उतारावरील माती कमकुवत होत आहे, त्यामुळे दगडांची मातीशी असलेली पकड सैल पडत आहे. पावसाच्या पाण्याचा जोर ही माती सहन करू शकत नाही आणि मग ही सैल झालेली माती आपल्यासोबत खडक, मोठे दगड सगळेच वाहून नेते. डोंगराळ भागात एक नैसर्गिक परिसंस्था कार्यरत असते. माती, झाडे, खडक, डोंगराचा उतार या सगळ्या गोष्टी एकमेकांना पूरक असतात आणि त्यामुळे अतिवृष्टीमुळे फारसे नुकसान होत नाही; परंतु वर म्हटल्याप्रमाणे अलीकडील काळात विकासाच्या नावाखाली आपण थेट निसर्गासोबतच पंगा घेतला आहे. त्याचे दृश्य परिणाम अशा घटनांमधून दिसून येतात. रेल्वेमार्गाचा विस्तार असो, पूल किंवा रस्ते बांधणे असो या सर्व गोष्टींमुळे डोंगराळ भागातील नैसर्गिक परिसंस्था विस्कळीत होत आहे. नैसर्गिक परिसंस्था अबाधित असेल तर साधारणपणे पावसाचे ५० ते ६० टक्के पाणी जमिनीत शोषले जाते; परंतु डोंगराळ भागातील उत्खनन, वृक्षतोड यामुळे ही परिसंस्थाच धोक्यात आली आहे, परिणामी जमिनीत पाणी शोषले जाण्याचे प्रमाण चिंताजनकरित्या कमी झाले आहे. हे पाणी जमिनीत शोषले जाण्याऐवजी जमिनीवर साचून राहते, त्यामुळे त्या भागातील मातीची खडकासोबत असलेली पकड सैल होते आणि त्यातून मग अशा भूस्खलनाच्या घटना घडतात. डोंगराळ भागात मोठमोठ्या दरडी कोसळण्यामागेही कोणताही शास्त्रीय आणि पर्यावरणविषयक विचार न करता बेफामपणे चाललेले विकास प्रकल्पच कारणीभूत आहेत. नैसर्गिक परिसंस्थेला अशीच हानी आपण पोहचवत राहिलो तर येत्या काळात अगदी साध्या पावसानेही डोंगर खचण्यासारख्या संकटांना आपल्याला तोंड द्यावे लागेल. निसर्गाची हेळसांड करून विकास केला जात असेल तर त्याची किंमत चुकवावी लागेल, हा इशारा पर्यावरणवादी नेहमीच देत असतात; परंतु त्यांना कुणी गांभीर्याने घेत नाही. त्याचे हे असे दुर्दैवी परिणाम आता समोर येऊ लागले आहेत.

# ऐतिहासिक पराक्रम....!

दोनच दिवसांपूर्वी निशाणेबाजीत कांस्यपदक जिंकून या प्रकारात भारतासाठी पहिली ऑलिम्पिक पदकविजेती ठरण्याचा बहुमान प्राप्त करणाऱ्या मनू भाकरने आता मिश्र दुहेरीतही सरबज्योत सोबत खेळताना दहा मीटर पिस्तूल स्पर्धेत कांस्यपदक प्राप्त केले. एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके प्राप्त करणारी मनू भाकर स्वतंत्र भारताच्या इतिहासातील पहिली खेळाडू ठरली आहे. यापूर्वी नॉर्मन प्रिचार्ड या इंग्लिश खेळाडूने १९००मध्ये याच पॅरिसमध्ये झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके प्राप्त केली होती, त्याने त्या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व केले असले तरी भारत त्यावेळी इंग्रजांची वसाहत होता आणि नॉर्मन प्रिचर्ड हादेखील इंग्लिश खेळाडू होता. त्यानंतर तब्बल सव्वाशे वर्षांनी एकाच स्पर्धेत दोन पदके प्राप्त करण्याचा भीमपराक्रम मनू भाकरने केला आहे. मनू भाकर आणि सरबज्योत या जोडीने कांस्यपदकाच्या लढतीत आपल्या कोरियन प्रतिस्पर्ध्यांवर १६-१० असा सहज पराभव केला. या शिवाय नेमबाजीत एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत भारताला दोन पदके प्राप्त होण्याचा योग तब्बल बारा वर्षांनी आला आहे. २०१२च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये विजय कुमार आणि गगन नारंग यांनी भारतासाठी पदके जिंकली होती. विशेष म्हणजे मनू भाकर ज्या स्पर्धेतील विशेषज्ञ समजली जाते ती २५ मीटर एअर पिस्तूल स्पर्धा अजून व्हायची आहे. या स्पर्धेत मनूला अजून एक पदक जिंकण्याची चांगली संधी आहे. २५ मीटर एअर पिस्तूल ही मनू भाकरची आवडती स्पर्धा आहे. याच प्रकारात यापूर्वी तिने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत २०२२ साली रौप्यपदक प्राप्त केले होते, तर पुढच्याच वर्षी याच स्पर्धेत तिला सुवर्णपदक मिळाले होते. थोडक्यात काय तर आपल्या पहिल्या यशापासून विक्रमाला गवसणी घालणाऱ्या मनू भाकरला 'न भूतो न भविष्यती' अशी ऐतिहासिक कामगिरी करण्याची अजून एक मोठी संधी आहे आणि तिचा वाढता आत्मविश्वास पाहता कदाचित आपल्या या यशाला ती सुवर्णमंडीत करू शकते. तसे झाल्यास भारतासाठी तो एक मोठा ऐतिहासिक प्रसंग असेल. काही वर्षांपूर्वी जो भारत ऑलिम्पिकमध्ये एखादे पदक मिळाले तरी समाधान मानत होता तोच भारत आज एकाच स्पर्धेत एकाच खेळाडूने दोन नव्हे तर तीन पदके प्राप्त करण्याची आशा बाळगत असेल तर किमान क्रीडा क्षेत्राच्या बाबतीत तरी मेरा देश बदल रहा है, हे विधान सत्य ठरेल, यात शंका नाही.

## कटाक्ष



**जयंत माईणकर**
9821917163

# बिनशर्त ते स्वतंत्र! राज ठाकरेंची बदलती भूमिका!

भाजपप्रणीत महाराष्ट्रातील महायुतीत शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) असताना राज ठाकरे यांच्या रूपाने चौथा भिडू यायची शक्यता फार कमी आहे. त्यातून मनसेला अत्यल्प जागा मिळतील. त्यामुळे अत्यल्प जागा घेऊन अपमानित होण्यापेक्षा नेमके उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे उमेदवार ज्या मतदारसंघात असतील त्या ठिकाणी आपला उमेदवार उभा करून त्यांच्या उमेदवाराला पाडण्याचा प्रयत्न ते करू शकतात.



लोकसभा निवडणुकीत भाजपला बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या राज ठाकरेंनी येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत सव्वा दोनशे तेअडीचशे जागा लढू, असे सांगून आपली भूमिका पुन्हा एकदा बदलली आहे. अठरा वर्षांपूर्वी शिवसेनेपासून फारकत घेतल्यानंतर वारंवार आपली भूमिका बदलणाऱ्या राज ठाकरेंनी पुन्हा तीच परंपरा कायम ठेवली आहे. केवळ पाच वर्षांपूर्वी 'लाव रे तो व्हिडिओ' म्हणत राज ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांची खिल्ली उडवली; पण उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री पदाकरिता काँग्रेस, राष्ट्रवादीचा हात धरल्यानंतर भाजपचा हात धरल्याशिवाय आपल्याला पर्याय नाही हे राज यांच्या लक्षात आले. त्यामुळे २०२४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या आधी राज ठाकरेंनी गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन लोकसभा निवडणुकीत भाजपला बिनशर्त पाठिंब्याची घोषणा केली. बिनशर्त या शब्दाचा उल्लेख 'बिनशर्ट पाठिंबा', असा करत उद्धव ठाकरेंनी खिल्ली उडविली.

२००९ च्या विधानसभेत निवडून आलेले तेरा आमदार हीच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची सर्वात मोठी मजल. त्यानंतर झालेल्या दोन विधानसभा निवडणुकांत मनसेची मजल एका आमदाराच्या पलीकडे जाऊ शकली नाही. आणि आताही भाजप-काँग्रेस यांच्या नेतृत्वाखालील दोन गटांत विभागल्या गेलेल्या महाराष्ट्राच्या राजकारणात मनसे आपले अस्तित्व दाखवू शकेल असे वाटत नाही; पण तरीही आपल्या अस्तित्वाने उद्धव ठाकरेंना शह देण्याचा प्रयत्न मात्र ते करू शकतात, कारण तेच त्यांचे मुख्य ध्येय आहे, असे वाटते. एक प्रकारे जे काम प्रकाश आंबेडकर भाजपकरिता करतात तेच काम राज ठाकरे करतील. ज्या प्रकारे वंचित बहुजन आघाडीचे मुख्य काम काँग्रेसकडे जाणारी दलित मते आपल्याकडे वळवून भाजपला मदत करणे हेच आहे, त्याचप्रमाणे मनसेचे काम असेल. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला मिळणारी मते आपल्याकडे वळवून एक प्रकारे भाजपला मदत करणे. १९८४ पासून २०२४ पर्यंत प्रकाश आंबेडकरांच्या पक्षाच्या उमेदवाराने मते खाल्ली म्हणून काँग्रेसच्या अनेक उमेदवारांचा पराभव झाला. अकोला लोकसभेची जागा भाजपच्या झोळीत नेहमी घातली गेली. आंबेडकरांवर या दुटप्पी भूमिकेबद्दल टीका झाली; पण त्यांनी भाजपला मदत करणारी आपली भूमिका सोडली नाही. महाराष्ट्रातील अनेक मतदारसंघांत केवळ वंचितच्या उमेदवारांमुळे काँग्रेसचा पराभव झाला, हा १९८९ पासून २०२४ पर्यंतचा इतिहास आहे. आत्तापर्यंत जे काम प्रकाश आंबेडकर काँग्रेस विरुद्ध करत होते, आता तेच काम राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्या विरोधात करावे, अशी भाजपची अपेक्षा असू शकते. आणि राज ठाकरेंना भाजपचा प्रस्ताव स्वीकारण्याशिवाय पर्याय नसेल. भाजपप्रणीत महाराष्ट्रातील महायुतीत शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) असताना राज ठाकरे यांच्या रूपाने चौथा भिडू यायची शक्यता फार कमी आहे. त्यातून मनसेला अत्यल्प जागा मिळतील. त्यामुळे अत्यल्प जागा घेऊन अपमानित होण्यापेक्षा नेमके उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे उमेदवार ज्या मतदारसंघात असतील त्या ठिकाणी आपला उमेदवार उभा करून त्यांच्या उमेदवाराला पाडण्याचा प्रयत्न ते करू शकतात. हीच कामगिरी भाजपसाठी करणाऱ्या वंचित आणि एमआयएम या पक्षांवर भाजपची बी टिम असल्याचा आरोप केला जातो. तसेच भाजप या पक्षांना आर्थिक पाठबळ पुरवतो असाही आरोप केला जातो. तोच आरोप मनसेवरही केला जाऊ शकतो. दोनशेच्या वर जागा लढायला लागणारे आर्थिक पाठबळ मनसेकडे नाही हे त्या पक्षाचे नेते खासगीत मान्य करतात. त्याचबरोबर आमच्यामुळे महाविकास आघाडीचे नुकसान होईल आणि महायुतीचा फायदा होईल हीच पक्षाची राजकीय खेळी असेल, हेही ते मान्य करतात.

अशा परिस्थितीत जर त्यांनी दोनशेच्या वर जागा लढवल्या, तर त्यामागे आर्थिक वरदहस्त लागेलच! या परिस्थितीत महायुतीत चौथा भिडू बनून कमी जागा पदरात पाडून घेणे राज ठाकरे स्वीकारतील, की दोनशेच्या वर जागा लढतील हे काही दिवसांत दिसेलच! लागोपाठ दोन विधानसभा निवडणुकीत केवळ एक जागा मिळविणारे राज ठाकरे यावेळी एक आकड्याच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न करतील. पक्षाला युतीत राहून फायदा होईल की स्वतंत्र राहून या प्रश्नाचे उत्तर केवळ राज ठाकरेच देऊ शकतात.

तूर्तास इतकेच!

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## दृष्टीकोन

**प्रदीप व्ही. खोलमकर**
8767592980

# '...हा कोणता न्याय?'

सर्वसामान्य गुन्हेगारांवर तात्काळ कारवाई; आणि राजकीय धेंडांना संरक्षण? मग जनतेने कसे मानायचे की, 'कायद्यापुढे कोणीही मोठा नसतो'. अशा वेळेसच तुमचे हात का बांधले जातात? हा कोणता न्याय आहे? असे अनेक प्रश्न मनात उपस्थित होतात. असा दुजाभाव होत असल्याने पोलिसांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारावी की नाही? अशी मनाची द्विधावस्था होते.



मागील आठवड्यात नाशिकमध्ये, एमपीडीए गुन्ह्यांतर्गत शिक्षा भोगून आलेल्या हर्षद पाटणकर या गुन्हेगाराची तुरुंगातून सुटका झाली. तो बाहेर आल्यानंतर त्याच्या गुन्हेगार साथीदारांनी त्याची शहरातून वाजत-गाजत, फटाक्यांची आतषबाजी करत मिरवणूक काढली. सोशल मीडियावर या 'धांगडधिंग्या'चा व्हिडिओ बघताच, नाशिक पोलिसांनी त्वरित घटनास्थळावर धाव घेत, या गुन्हेगाराची ही 'वरात' थेट पोलीस स्टेशनात आणली. पाटणकरसह त्याच्या काही सहकाऱ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई करत, त्यांना परत 'सरकारी पाहुणे' बनविले. 'पुणेरी पॅटर्न'चा हा पहिलाच 'ओंगाळवाणा' प्रकार नाही. अधूनमधून विविध मोठ्या शहरांत असे 'गलिच्छ' प्रदर्शन बघायला मिळते. पुण्यातील गज्या मारणे या कुख्यात गुन्हेगाराची काही महिन्यांपूर्वी अशीच मिरवणूक काढली होती. नंतर गुन्हेगार विश्वात तसा पायंडाच पडला, म्हणून त्याला 'पुणेरी पॅटर्न', असे संबोधले जाते.


नाशिक पोलिसांनी 'विद्युत' वेगाने धाव घेत, या गुन्हेगारांवर कारवाई करून त्यांच्या पुन्हा 'मुसक्या' आवळल्या, ही खरोखरच कौतुकास्पद आणि अभिनंदनीय बाब आहे; पण याआधी राजकारणातील काही गुन्हेगारांनीही जामिनावर बाहेर आल्यानंतर आपल्या 'बगलबच्च्यां'करवी अशा वराती काढून स्वतःला मिरवून घेतले होते. त्यावेळी त्यांच्यावर कोठलीच कारवाई का केली गेली नाही? ते काही निर्दोष सुटलेले नव्हते. किंवा त्यांनी राज्याची मान अभिमानाने उंचावेल, असा कोणता 'भीमपराक्रम'ही केला नव्हता. अंडरवर्ल्डशी हातमिळवणी, खंडणी गोळा करणे, मराठी माणसांना बेघर करत आर्थिक घोटाळा करणे, अशा राज्याची इज्जत धुळीत मिळवणारे गंभीर प्रकरणातील ते 'आरोपी' आहेत. पुढारी असले तरी कायद्याने ते 'गुन्हेगार'च आहेत. त्यांच्या वरातींना तर प्रचंड गर्दी होती. त्यावेळी वाहतुकीवर परिणाम होऊन जनतेचा खोळंबा झाला नव्हता का? कर्णकर्कश डीजे, फटाक्यांची आतषबाजी आणि बगलबच्च्यांच्या शिट्या, घोषणा, आरडाओरडा याचाही त्रास होत नाही का? यथासांग वरातीची सांगता झाली की, बेशरमपणे स्वतःची तुलना स्वातंत्र्य सैनिक, हुतात्म्यांशी करायची. जातीयवादी आणि प्रक्षोभक विधाने करायची. खोट्या गुन्ह्यात अडकवले, अशा 'चोराच्या उलट्या बोंबा मारत' जनतेची दिशाभूल करायची. यावेळी कोठे जाते पोलिसांची कार्यतत्परता? यावेळी कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत नाही का? कारवाई करण्याऐवजी, अशा घटनांकडे डोळेझाक करून त्यांना संरक्षण दिले जाते. सर्वसामान्य गुन्हेगारांवर तात्काळ कारवाई; आणि राजकीय धेंडांना संरक्षण? मग जनतेने कसे मानायचे की, 'कायद्यापुढे कोणीही मोठा नसतो'. अशा वेळेसच तुमचे हात का बांधले जातात? हा कोणता न्याय आहे? असे अनेक प्रश्न मनात उपस्थित होतात. असा दुजाभाव होत असल्याने पोलिसांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारावी की नाही? अशी मनाची द्विधावस्था होते.

एखाद्याचा रुमाल चोरला तरी तो गुन्हाच होतो; आणि एखाद्याचे करोडो रुपये चोरले तरी तोही गुन्हाच होतो. बेकायदेशीरपणे केलेले कोणतेही दुष्कृत्य करणारा, मग तो गरीब असो की श्रीमंत, भिकारी असो वा प्रतिष्ठित तो गुन्हेगारच ठरतो; आणि कायद्यानुसार शिक्षेस तो पात्र ठरतो. गुन्हेगाराला जात आणि धर्म नसतो तसाच त्याला चेहराही नसतो. कायद्यापुढे कोणीही छोटा नाही, कोणीही मोठा नाही. थोडक्यात, कायद्यापुढे सर्व समान आहेत, असा याचा अर्थ होतो, पण खेदाने नमूद करावेसे वाटते की, आता कायद्यात पहिल्यासारखा 'रामशास्त्री' बाणा राहिला नाही. कायदा अस्तित्वात आहे की नाही? असा चिंताजनक प्रश्न दिवसेंदिवस वाढत चाललेल्या गुन्ह्यांमुळे उपस्थित होतो. पूर्वी 'कानूनके हात बहूत लंबे होते है' असे म्हटले जात होते, पण आता 'कानूनके हात बंधे होते है' असे म्हणण्याची वेळ आली आहे; आणि ही वेळ जे कायदे बनवतात, तेच त्याची वाट लावतात, म्हणून आली आहे. 'कुंपणच शेत खात असेल' तर दोष कोणाला द्यायचा?

नाशिकच्या घटनेवर प्रतिक्रिया देताना पोलीस आयुक्त म्हणाले की, असे शक्तिप्रदर्शन खपवून घेतले जाणार नाही. संबंधितांवर गुन्हे दाखल करून कारवाई केली जाईल. प्रश्न असा पडतो की, नेत्यांच्या वराती या शक्तिप्रदर्शन नसते का? त्यांच्यावर कारवाई का केली जात नाही? इतर गुन्हेगारांपेक्षा या 'व्हाईट कॉलर' गुन्हेगारांचा समाजाला जास्त धोका आहे.

नुकताच अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर त्यांच्याच पक्षातील कार्यकर्त्याने गोळीबार केला. दुसऱ्याच क्षणी हल्लेखोराला गोळ्या घातल्या गेल्या. २/३ दिवसांनी पुन्हा चाकू हल्ल्याचा प्रयत्न होणार होता, पण त्या व्यक्तीलाही ठार करण्यात आले. अजून एका देशात एका महिला पत्रकाराने पंतप्रधानांवर उंचीवरून टीका केली. तिच्यावर गुन्हा दाखल करत अटक करण्यात आली; आणि मोठ्या रकमेचा दंडही ठोठावण्यात आला. याला म्हणतात कायदा. हर्षद पाटणकरवरची कारवाई योग्यच; पण माणसे बघून कायद्याचा वापर कसा काय केला जातो, हा प्रश्न उद्भवतोच.

## डिजिटेक



**देवनाथ गंडाटे**
7264982465
डिजिटल मीडिया अभ्यासक, नागपूर

# डिजिटल युगात पासवर्ड म्हणजे सुरक्षा कवच!

आपण आपल्या घराबाहेर पडतो, तेव्हा सुरक्षेच्या कारणास्तव कुलूप लावून जातो. प्रवास करताना साहित्य किंवा बॅग जपून सुरक्षित ठेवतो. वाहनेदेखील लॉक करून पार्क करतो. म्हणजेच काय महत्त्वपूर्ण वस्तू आपण चोरांपासून सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करतो. आजच्या डिजिटल युगात, आपले जीवन ऑनलाइन जगासोबत गुंतलेले आहे. ऑनलाइन जगातदेखील चोरटे अर्थात हॅकर्स मोठ्या प्रमाणात वावरत असतात. व्यावहारिक जीवनामध्ये जसे कुलूप महत्त्वाचे आहे, तसे ऑनलाइन जगामध्ये पासवर्ड महत्त्वाचा आहे. आपल्या डिजिटल संपत्तीचे रक्षण करण्यासाठी कोणालाही सहज लक्षात येणार नाही, असा पासवर्ड वापरणे आवश्यक आहे.

आज आपण ऑनलाइन बँकिंग, सोशल मीडिया, ई-कॉमर्स आणि इतर अनेक सेवा घेतो. विविध ॲप किंवा वेबसाईटवर लॉगिन करतो. त्यासाठी आपल्याला अकाउंट क्रिएट करावे लागते. त्यासाठी पासवर्ड तयार करताना अनेकदा सोपे आणि सहज आठवण राहील, असे अक्षर किंवा आकडे देतो, पण हीच चूक आपल्याला महागात पडते. ईमेल, ऑनलाइन बँकिंग, फेसबुक-इन्स्टाग्राम-ट्विटरसारखा सोशल मीडिया किंवा मग शॉपिंग ॲप्ससाठी एक पासवर्ड ठेवावा लागतो. आणि तो लक्षातही ठेवावा लागतो, म्हणून मग अनेकदा आपण शॉर्टकट्स मारतो. हीच गोष्ट धोकादायक ठरू शकते.

पासवर्ड हा आपल्या डिजिटल आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे ऑनलाइन संपत्ती सुरक्षित ठेवायची असेल, तर चोरट्यांना तो सापडू नये असा असावा. पासवर्ड हा एक अक्षर, संख्या आणि विशेष चिन्हांचा असावा. जो आपल्याला आपल्या ऑनलाइन खात्यात प्रवेश करण्यास मदत करतो. पासवर्ड आपली वैयक्तिक माहिती, बँक खात्याची माहिती आणि इतर गोपनीय माहिती सुरक्षित ठेवण्यास मदत करतात. पासवर्ड आपल्या खात्यात अनधिकृत प्रवेश रोखतात. मजबूत पासवर्ड आपल्याला आपल्या ऑनलाइन खात्यांवर अधिक विश्वास ठेवण्यास मदत करतात. आपले पासवर्ड नियमितपणे बदलत असावे. विशेषतः जर तुम्हाला असे वाटत असेल की तुमचे खाते कोणत्याही प्रकारे धोक्यात आले आहे, तेव्हा वेळीच ते बदला. टु स्टेप व्हेरिफिकेशन ठेवल्यास तुमच्या खात्यात प्रवेश करण्यासाठी तुम्हाला मोबाईलद्वारे परवानगी द्यावी लागते. त्यामुळे चोरटे प्रवेश करू शकत नाही. या पासवर्डमुळे आपल्या स्मार्टफोनमध्ये सहजपणे कोणी डोकावू शकत नाही अथवा त्यामधील इतर माहितीही आपण स्वतः तो उघडून दिल्याशिवाय कुणालाही पाहता येत नाही. म्हणजे हा पासवर्ड आपल्या स्मार्टफोनसाठी एक प्रकारे आपल्या वैयक्तिक पहारेकऱ्याचे काम करतो. त्यासाठी मजबूत पासवर्ड तयार करावा. लहान शब्दांच्या ऐवजी अक्षरे, संख्या आणि विशेष चिन्हे यांचे मिश्रण वापरावे. पासवर्ड किमान ८-१२ अक्षरांचा असला पाहिजे. सामान्य शब्द, जन्मदिवस किंवा फोन नंबर यांचा वापर करू नका. फिशिंग इ-मेल आणि मोबाईल संदेश लिंकपासून सावध राहा. वेळोवेळी आपला पासवर्ड डेटा लीक झाला आहे का याची तपासणी करा. पासवर्ड व्यवस्थापक टूलचा वापर करून आपले सर्व पासवर्ड सुरक्षितपणे संग्रहित करा. पासवर्ड मॅनेजर तुमच्यासाठी नवीन युनिक पासवर्ड तयार करेल आणि हे पासवर्ड्स सुरक्षितही ठेवेल. यानंतर तुम्हाला एखाद्या अकाऊंटमध्ये लॉग इन करताना या पासवर्ड मॅनेजरच्या मदतीने लॉग इन करता येईल. या पासवर्ड मॅनेजरचा फायदा म्हणजे दर वेळी नवा-वेगळा पासवर्ड तयार करण्याचे काम तुम्हाला करावे लागणार नाही. शिवाय तुमचे यापूर्वी तुम्ही ठरवलेले काही पासवर्ड सुरक्षित नसतील, तर तशी सूचनाही पासवर्ड मॅनेजर तुम्हाला देईल. सार्वजनिक ठिकाणी वायफाय नेटवर्कवर संवेदनशील माहिती देऊ नका. आपल्या डिव्हाइस आणि सॉफ्टवेअरला नेहमी अपडेट करा, जेणेकरून तुमची माहिती चोरी जाणार नाही.


## वाचक विचार मंच

### दुःखदायक बातम्यांनी समाजमन सुन्न

मुंबई, पुण्यातील हिट अँड रनच्या घटनांमध्ये झालेले निष्पापांचे मृत्यू, पुण्यातील कोयता गँगची दहशत, विरारमधील दोन गटांत झालेल्या हाणामारीत एकाचा मृत्यू झाल्याची ताजी घटना, नवी मुंबईतील दोन वेगळ्या घटनांमध्ये दोन तरुणींची अत्याचार करून झालेली हत्या, अशा गेल्या काही दिवसांतल्या वर्तमानपत्रातील अनेक बातम्यांनी समाजमन अक्षरशः सुन्न झाले आहे. त्यातच आता पुण्यातील आणखी एका धक्कादायक आणि दुःखदायक बातमीची भर पडली आहे. गेल्या सहा महिन्यांपासून मोबाइलवरच्या ब्ल्यू व्हेल गेमच्या विळख्यात अडकलेल्या एका १५ वर्षीय कोवळ्या मुलाने १४ व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. वास्तविक वेगवेगळे टास्क देऊन शेवटी आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या या सुसाइड गेम ब्ल्यू व्हेलच्या जंजाळात अडकून गेल्या काही वर्षांत देशभरात अनेक मुलांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या. २०१७ साली केंद्र सरकारने या जीवघेण्या गेमवर बंदी आणून या गेमच्या सर्व लिंक कायमस्वरूपी नष्ट करण्याचे आदेश दिले होते. तरीही बंदी घातलेल्या अशा लिंक या मुलांना कुठून मिळतात हे एक न उलगडलेले कोडे आहे.

**प्रदीप शंकर मोरे**
मुंबई, मो. नं.: मो. नं.: ९८७०७७७२७४

### कर्ज बुडव्यांमुळे अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम!



अनेक श्रीमंत, अतिश्रीमंत व्यक्तींनी बँक कर्जे बुडविली असून यामुळे अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झाला आहे; पण याकडे दुर्लक्ष होत असून सर्वसामान्य जनतेला मात्र अनेक कर भरावे लागतात. याला काय म्हणावे? कर्जे बुडवून हे कर्ज बुडवे परदेशात ऐशआरामात जगतात. सर्वसामान्य जनता मात्र पोट कोरून कर भरते. या फरारी गुन्हेगारांवर तातडीने कारवाईचे आदेश हवेत. आणि सर्वसामान्य जनतेसाठी विचारविनिमय होऊन काही सकारात्मक व्हावे, ही अपेक्षा व्यक्त होत आहे.

**प्र. मु.काळे**
सातपूर, नाशिक
मो. नं.: ९२७३०४५७९४

## धम्माल

**ढूंडो ढूंडो रे साजना!**
अय्या गडे!
इश्श गडे!!
पूजाताई गेल्या
सांगा बरं कुणीकडे?
एकामागून एक
खुलासे होताहेत पटापट
मीडिया ओरडून सांगतोय
कागदपत्रे आहेत बनावट
पोलिसांचीसुद्धा
ह्यावर आहे नजर
कधी होणार पूजाताई
तुम्ही चौकशीला हजर?
बाबांचा पत्ता नाही
कोठडीत आहे आई
मावशी म्हणाली पेंद्या
खरंच अवघड आहे बाई

**ॲड. अनंत खेळकर**, अकोला

## संवाद

# मंदिर प्रवेशासाठी ड्रेस कोड आवश्यक!

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री महाकालेश्वर मंदिरात देशातूनच नव्हे, तर विदेशातूनही भाविक उज्जैन या धार्मिक नगरीतील बाबा महाकालच्या मंदिरात दर्शनासाठी येत असतात. येणाऱ्या भाविकांमध्ये काही भाविक बर्म्युडा, रात्री परिधान करण्याचे ड्रेस, तोकडे कपडे घालून येतात त्यामुळे मंदिर व्यवस्थापनाची व भारतीय संस्कृतीची खिल्ली उडविली जाते. व्यवस्थापनाने मंदिर प्रवेशासाठी कोणत्या प्रकारचे ड्रेस कोड असावेत याबाबत काही प्रस्ताव किंवा निर्णय घेतलेला नसला तरीही पुरुष भाविकांनी कुर्ता-पायजमा, शर्ट- पँट तर महिला, मुलींनी सलवार-कुर्ती अथवा साडी परिधान करणे जे भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब आहे त्यांचा वापर करणे इष्ट ठरावे असे श्री महाकालेश्वर व्यवस्थापनाचे म्हणणे आहे. तोकडे कपडे घालणाऱ्या व अश्लीलतेचे दर्शन घडविणाऱ्या भाविकांवर मंदिर व्यवस्थापनाने यापूर्वी कारवाई केली आहे. देवदर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांनी भारतीय संस्कृतीची व मंदिर व्यवस्थापनाची चेष्टा होणार नाही अशा प्रकारचे कपडे परिधान करावेत असे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आवाहन जरी केले नसले तरी गरज भासल्यास त्याप्रमाणे विचार करण्यात येईल असे मंदिर व्यवस्थापनाच्या अध्यक्षांनी म्हटले आहे.


आजकाल भटकंती, पर्यटन, प्रवास, करताना ज्या प्रकारचे फॅशनचे, अर्धे तोकडे कपडे परिधान केले जातात त्याच प्रकारचे कपडे देवदर्शन, मंदिरे, तीर्थक्षेत्रे यांसारख्या पवित्र ठिकाणी वापरून



मंदिरे, यात्रास्थळे, तीर्थक्षेत्रे यांसारख्या ठिकाणच्या देवदेवतांचे पावित्र्य राखले जात नाही. यात सुधारणा व दुरुस्ती होणे आवश्यक आहे. नागरिकांनी प्रत्येक ठिकाणचे महत्त्व व पावित्र्य राखण्यासाठी स्थानिक प्रशासनांना नियमावली जाहीर करणे भाग पाडू नये, असे सुचवावेसे वाटते.

**स्नेहा राज,**
गोरेगाव
मो. नं.: ९९६७०१५८९९

## गुल्लेर



**नरेंद्र इंगळे**
9561226572

# घोरच आहे सारा..

'कायची गर्दी आहे छबुराव एवढी?'

'हे लाडकी बहीन.. बायाईले देला धंदा लाऊन.. अकरा वाजले की बाया थैल्या घेऊनच हिंडतात.'

'एवढी गर्दी पह्यल्यांदाच पाहून राह्यलो.'

'भारताची लोकसंख्याच तेवढी आहे ना.. तरी ह्या अर्ध्या बाया आहेत. ज्याच्या घरी चारचाकी गाड्या आहेत ते घराच्या बाहीर निंगालेच नाहीत.'

'ज्या रस्त्यानं गेलो त्या रस्त्यावर भुसूभुसू लोकंच दिसतात. एसटीत गर्दी.. रेल्वेत गर्दी.. दवाखान्यात गर्दी..'

'लोकसंख्येवर काहीच नियंत्रन नाही सरकारचं.'

'जो पक्ष म्हनीन की लोकसंख्या कमी करा त्याले हिंदूविरोधी समजल्या जाते. बरं बोंबलून काही फायदा नाही. लोकं आयकत नाहीत. कारखाने सुरूच आहेत. त्या कोरोनाच्या काळात लोकं घरीच होते.. त्याकाळात जन्मदर खपकन वर गेला.'

'लोकसंख्येवर काहीतरी कायदा पाह्यजे.'

'कायदा होत नाही. सरकारले मतं पाह्यजात.'

'मंग एकच इलाज आहे.. दोन लेकराच्या वरते सवलती बंद करा.'

'हाच उपाय चांगला आहे. सवलतीच्या भेवानं लोकसंख्या कंट्रोल होईन.'

'जगात एक नंबरची लोकसंख्या भारतात आहे. काही लोकाईले त्याचाच गर्व आहे. भारत महासत्ता झाला म्हनतात.'

'खोगीर भरतीनं देश महासत्ता होत असते काय म्हना भयानेहो? देशात सुशिक्षित, शास्त्रज्ञ, विचारवंत किती आहेत, ते महत्त्वाचं असते. भारतात त्याचा काही विचारच नाही. फक्त कौम बढाओ.'

'या भरमसाठ लोकसंख्येनं साऱ्याच गोष्टीवर परिनाम झाला. खायाले लय पाह्यजे.. जे पाह्यजे ते भेटत नाही म्हनून बिमाऱ्या वाढल्या. महागाई वाढली. जवान पोरं पदव्या घेऊन मोकाट फिरुन राह्यले. नोकऱ्या कमी झाल्या. परीक्षेचे निकाल वेळेवर लागत नाही. मंधातच पेपर फुटते. सरकारी योजनेसाठी रांग लावा लागते. कागदपत्र टाईमावर भेटत नाहीत. पोराईची ॲडमिशन लटकते.'

'सारे घोरच घोर आहेत भारतात.. जो- तो आपल्याच डावावर आहे. आपलं जमलं की झालं.. मंग तिकडे काही असो.'



## सुदर्शनचक्राची चाचणी यशस्वी

# एस-४०० क्षेपणास्त्राने ८० टक्के विमाने नष्ट

**नवी दिल्ली :** भारतीय वायुसेनेने अलीकडेच आपल्या हवाई संरक्षण कवच म्हणजेच 'सुदर्शनचक्राची यशस्वी चाचणी केली. शत्रूची राफेल, सुखोई आणि मिग लढाऊ विमाने या शस्त्रास्त्रांच्या दिशेने पाठवल्यानंतर सुदर्शन चक्र सक्रिय झाले. त्याने शत्रूच्या सर्व लक्ष्यांपैकी ८० टक्के विमानांचे अचूकपणे निरीक्षण करत ती नष्ट केली. या सरावाचा उद्देश एस-४०० हवाई संरक्षण प्रणालीच्या क्षमतेची चाचणी घेणे हा होता.

भारतीय हवाई दलाच्या 'सुदर्शनचक्र' म्हणजेच एस-४०० हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणालीने युद्ध सरावात शत्रूची ८० टक्के लढाऊ विमाने पाडली. हवाई दलाच्या युद्ध सरावादरम्यान लष्कराच्या उर्वरित लढाऊ विमानांना माघार घ्यावी लागली आणि त्यांना मोहीम रद्द करावी लागली. हवाई दलाने थिएटर स्तरावरील युद्ध सराव आयोजित केला होता. या सरावात एस-४०० हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणालीचा एक स्क्वॉड्रन तैनात करण्यात आला होता. यावेळी हवाई दलाची राफेल, सुखोई आणि मिग लढाऊ विमाने शत्रूच्या रूपात उडाली. रशियाकडून आयात करण्यात आलेल्या एस-४०० क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीमध्ये ४०० किलोमीटर अंतरावरून आपले लक्ष्य शोधून प्रतिहल्ला करण्याची क्षमता आहे. एअर चीफ मार्शल व्ही. आर. चौधरी यांनी याला 'सुदर्शन चक्र' असे नाव दिले आहे. 'सुदर्शनचक्र' हे भगवान श्रीकृष्णाचे प्रमुख शस्त्र आहे. एस-४०० ही हवाई संरक्षण प्रणाली आहे. हे हवेतून होणारे हल्ले टाळते. क्षेपणास्त्र, ड्रोन, रॉकेट लॉन्चर आणि शत्रू देशांच्या लढाऊ विमानांचे हल्ले रोखण्यासाठी ते प्रभावी आहे. हे रशियाच्या अल्माझ सेंट्रल डिझाईन ब्युरोने तयार केले असून जगातील सर्वात आधुनिक हवाई संरक्षण प्रणालींमध्ये गणले जाते. एस-४०० एकावेळी ७२ क्षेपणास्त्रे डागू शकते. ही हवाई संरक्षण यंत्रणा ट्रकवर बसवलेली असल्याने ती कोणत्याही ठिकाणी हलवणे खूप सोपे आहे.

### रशियासोबत ३५ हजार कोटी रुपयांचा करार

एस-४०० च्या पाच स्क्वॉड्रनसाठी भारत आणि रशिया यांच्यात २०१८ मध्ये ३५ हजार कोटी रुपयांचा करार झाला आहे. यापैकी ३ स्क्वॉड्रन चीन आणि पाकिस्तान सीमेवर तैनात आहेत. आणखी २ येणे बाकी आहे. रशिया-युक्रेन युद्धामुळे त्याला विलंब होत आहे. ऑगस्ट २०२६ पर्यंत ते हवाई दलाला दिले जातील, अशी अपेक्षा आहे. एस-४०० देशाच्या सुरक्षेसाठी गेम चेंजर ठरतील असा विश्वास लष्कराला आहे. युक्रेनविरुद्धच्या युद्धात रशियाने एस-४०० क्षेपणास्त्रांचा वापर केला आहे.

# पाकमध्ये निघाले सरन्यायाधीशांना मारण्याचे आदेश!

इस्लामाबाद : पाकिस्तानमध्ये काय होईल याबद्दल काहीही सांगता येत नाही. येथे अल्पसंख्याकांवर हल्ले होत आहेत पण आता सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीशही कट्टरवाद्यांचे लक्ष्य झाले आहेत. पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांशी संबंधित एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. येथे सरन्यायाधीश काझी फैज इसा यांच्या हत्येचे आदेश देणाऱ्या कट्टरपंथी इस्लामिक पक्षाच्या उपप्रमुखाला अटक करण्यात आली आहे.



याबाबत माहिती देताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, सरन्यायाधीशांच्या एका निर्णयाबाबत त्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. त्यांनी अल्पसंख्याक अहमदिया समुदायातील एका व्यक्तीला जामीन मंजूर केला, ज्यावर ईश्वरनिंदा केल्याचा संशय आहे.

पाकिस्तानमध्ये अल्पसंख्याक समुदायाच्या लोकांना ईशनिंदेसाठी अनेकदा लक्ष्य करण्यात आले आहे. तेहरीक-ए-लब्बैक पाकिस्तान (टीएलपी) उपअमीर पीर झहीरुल हसन शाह यांना दहशतवाद आणि इतर आरोपांखाली अटक करण्यात आली आहे, असे पंजाब पोलिसांच्या प्रवक्त्याने सांगितले. तो पूर्व पंजाब प्रांतातील ओकारा शहरात लपून बसला होता. मुबारक सानी खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात लाहोर प्रेस क्लबबाहेर आयोजित केलेल्या रॅलीत केलेल्या भाषणाबद्दल त्यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्यात आल्यानंतर ही अटक करण्यात आली. त्यांच्या भाषणाच्या व्हायरल व्हिडिओमध्ये शाह हे त्यांच्या समर्थकांना सांगत आहेत की जो कोणी सरन्यायाधीश इसा यांचा शिरच्छेद करील त्याला मी एक कोटी रुपये देऊ असे आदेशात म्हटले आहे.

# यूपीतील राजकीय गोंधळात स्वयंसेवक संघाचा हात- राकेश टिकैत

देशोन्नती वृत्तसंकलन

**लखनौ :** उत्तर प्रदेशचे राजकारण सध्या चांगलेच तापले आहे. उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य यांनी सरकारपेक्षा संघटना मोठी असल्याच्या वक्तव्यानंतर भाजपमध्ये भांडणे सुरू झाल्याची चर्चा आहे. दरम्यान, यूपीतील राजकीय गोंधळामागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा हात असल्याचा मोठा दावा शेतकरी नेते राकेश टिकैत यांनी केला आहे. तसेच संघाला कोणत्याही नेत्याची तयारी नको असून आता दोन्ही उपमुख्यमंत्र्यांवर कारवाई केली जाईल', असे त्यांनी म्हटले आहे.

एका वृत्तवाहिनीशी बोलताना, उत्तर प्रदेशमध्ये भाजपमध्ये कमालीची कुरबुरी सुरू असल्याचा प्रश्न उपस्थित केला गेला. लखनौला येण्याचे प्रयोजन काय? राकेश टिकैत म्हणाले, मी इथे माझ्या लोकांना भेटायला आलो आहे. आमचे लोक वेगवेगळया ठिकाणांहून इथे आले आहेत.



**शिमला :** हिमाचल प्रदेशात महामार्गावर दरड कोसळल्याने एका प्रवाशाचा मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेबाबत पोलिसांनी सांगितले की, हिमाचल प्रदेशातील सोलन जिल्ह्यातील कालका-शिमला राष्ट्रीय महामार्गावर डोंगराच्या माथ्यावरून पडलेल्या दगडांमुळे एका वाहनाचे नुकसान झाले आणि त्यात प्रवास करणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू झाला.

# सीमा वादात कुठल्याही त्रयस्थाच्या भागीदारी नको!

### क्वाड बैठकीपूर्वी विदेशमंत्री जयशंकर यांचे वक्तव्य



वृत्तसंस्था

**टोकियो :** भारत आणि चीन यांच्यात असलेल्या सीमा वादात कुठल्याही त्रयस्थाच्या भागीदारीची शक्यता विदेशमंत्री एस. जयशंकर यांनी फेटाळून लावली आहे. हा मूळ स्वरुपात द्विपक्षीय मुद्दा असल्याने दोन्ही देशांनीच सोडवायचा आहे, चीनसोबतचे भारताचे संबंध सामान्य नाहीत, यामागील कारण चीनने २०२० मध्ये सीमेवर सैन्य तैनात करून करारांचे उल्लंघन करणे होते असे जयशंकर यांनी स्पष्ट केले.

भारत आणि चीनमधील वाद सोडविण्यासाठी आम्ही अन्य देशांकडे पाहणार नाही. ज्या दोन देशांदरम्यान वाद आहे, चर्चा केवळ त्या दोघांमध्येच व्हायला हवी आणि अशाप्रकारच्या प्रकरणांमध्ये कुठल्याही त्रयस्थाचा हस्तक्षेप नको असे जयशंकर यांनी एका पत्रकार परिषदेत म्हटले आहे. जयशंकर हे क्वाड विदेश मंत्र्यांच्या बैठकीसाठी जपानची राजधानी टोकियोच्या दौऱ्यावर होते. चीनसोबतचे आमचे संबंध फारसे चांगले नाहीत. २०२० मध्ये कोरोना संकटकाळादरम्यान चीनने सीमाक्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात सैन्य तैनात करत करारांचे उल्लंघन केले होते. यामुळे झटापड झाली आणि दोन्ही देशांची जीवितहानी झाली होती असे जयशंकर यांनी म्हटले आहे. चीनकडून सैन्य तैनात करण्यात आल्याचा परिणाम अद्याप जारी आहे, कारण हा मुद्दा पूर्णपणे निकालात निघालेला नाही. चीनसोबत सध्या संबंध चांगले नाहीत, सामान्य नाहीत, एक शेजारी म्हणून आम्ही चांगल्या संबंधांची अपेक्षा करतो; परंतु नियंत्रण रेषेचा आदर केला आणि पूर्वीच्या करारांचे पालन केले तरच हे घडू शकते असे जयशंकर यांनी स्पष्ट केले. भारत-चीन संबंधांचा जागतिक विषयांवरही महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो, कारण दोन्ही देश महत्त्वाची शक्ती आहेत. दोन्ही देशांदरम्यान एक समस्या असून त्यावर चर्चेद्वारे तोडगा काढला जाण्याची गरज असल्याचे जयशंकर यांनी म्हटले आहे.

# तुर्कियेच्या अध्यक्षांची इस्त्रायलला धमकी

### इस्रायलकडून चोख प्रत्युत्तर : सद्दाम हुसैनसारखी गत होईल

वृत्तसंस्था

**अंकारा/ तेल अवीव :** मध्यपूर्वेत तणावादरम्यान आता तुर्कियेने इस्रायलला धमकी दिली आहे. तुर्कियेचे अध्यक्ष रेसेप तैयप एर्दोगान यांनी इस्रायलच्या विरोधात सैन्य कारवाईची धमकी दिली आहे. तर इस्रायलने एर्दोगान यांची गत इराकचे माजी हुकुमशहा सद्दाम हुसैन यांच्यासारखी होईल असे प्रत्युत्तर दिले आहे. इस्रायलवर हल्ला करण्याची धमकी देत एर्दोगान हे सद्दाम हुसैन यांचे अनुकरण करू पाहत आहेत; परंतु सद्दाम हुसैन यांचा अंत कसा झाला हे एर्दोगान यांनी आठवू पाहावे असे इस्रायलचे विदेशमंत्री काट्ज यांनी म्हटले आहे. तुर्कियेचे सैन्य इस्रायलमध्ये घुसू शकते, यापूर्वी लीबिया आणि नागोर्नो-काराबाखमध्ये आमचे सैन्य शिरले होते असा दावा एर्दोगान यांनी केला होता. एर्दोगान हे इस्रायलच्या गाझामधील सैन्यमोहिमेचे कट्टर विरोधक राहिले आहेत. इस्रायलला पॅलेस्टाइनवर अन्याय करता येऊ नये म्हणून आम्हाला मजबूत व्हावे लागणार आहे.

# गेमचेंजरऐवजी भाजप केवळ नेमचेंजर ठरला; नवीन पटनायक यांची टीका

देशोन्नती वृत्तसंकलन

**भुवनेश्वर :** गेमचेंजर ठरण्याचे आश्वासन देऊन भाजप ओडिशात सत्तेवर आला. प्रत्यक्षात तो पक्ष केवळ नेमचेंजर ठरला, असे टीकास्त्र माजी मुख्यमंत्री आणि बिजदचे प्रमुख नवीन पटनायक यांनी सोडले. अर्थ खाते सांभाळणारे ओडिशाचे मुख्यमंत्री मोहनचरण माझी यांनी नुकताच राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. त्यावर विधानसभेत चर्चा झाली. त्यामध्ये सहभागी होत सभागृहातील विरोधी पक्षनेते असणाऱ्या पटनायक यांनी सत्ताधारी भाजपवर शाब्दिक हल्लाबोल केला.

भाजप सरकारच्या अर्थसंकल्पात आमच्या मागील सरकारच्या ८० टक्के योजनांचा समावेश करण्यात आला आहे. अधिक भर योजनांची नावे बदलण्यावर देण्यात आला आहे. ४५ योजनांची नावे बदलण्यात आली आहेत. त्यामुळे नवे



सरकार नेमचेंजर ठरले आहे, अशी टिप्पणी त्यांनी केली. विधानसभा निवडणुकीआधी भाजपने अनेक आश्वासने दिली. मात्र, त्यांची पूर्तता करण्यासाठी अर्थसंकल्पात आवश्यक निधीची तरतूद करण्यात आलेली नाही, असेही त्यांनी म्हटले. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजपने बाजी मारून बिजदला सत्तेवरून दूर केले. त्यामुळे प्रदीर्घ काळ मुख्यमंत्रिपद भुषवलेल्या पटनायक यांना विरोधी पक्षनेतेपदाची नवी भूमिका स्वीकारली लागली आहे. मवाळ व्यक्तिमत्त्वासाठी ओळखले जाणारे पटनायक त्या भूमिकेत शिरल्यानंतर धारदार टीका करताना दिसत आहेत.

# पूजा खेडकरच्या अडचणीत पुन्हा वाढ!

### केंद्राच्या कार्मिक प्रशिक्षण विभागाची नोटीस

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर यांच्यावर एकापाठोपाठ एक खोटेपणाचे आरोप करण्यात आल्यानंतर त्यांच्यापुढे नवा प्रश्न निर्माण झाला आहे. केंद्र सरकारच्या मानवी संसाधनांचा तपशील सांभाळणाऱ्या कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने (अ्ध्इऊ) पूजा खेडकर यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या प्रकरणाशी संबंधित डीओपीटीच्या अधिकाऱ्यांनी एका वृत्तपत्राला सांगितले की, विविध एजन्सींच्या चौकशीनंतर २६ जुलै रोजी त्यांच्या पत्त्यावर कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली होती. खेडकर



यांना नोटीसला उत्तर देण्यासाठी सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, प्रक्रियेनुसार, नोटीस जारी करण्यात आली आहे आणि त्यांचे उत्तर मागविण्यात आले आहे. त्या एकतर डीओपीटीसमोर वैयक्तिकरित्या हजर राहू शकते किंवा लेखी उत्तर पाठवू शकते. त्या नोटीसला कशी उत्तर देते हे पूजा खेडकर यांच्यावर अवलंबून असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. त्यांनी प्रतिसाद न दिल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे या अधिकाऱ्याने म्हटले आहे. इददर्रे ख्र्ऴ्रे मुदतीत त्यांनी उत्तर न दिल्यास पुढील कारवाई केली जाईल, असे ते म्हणाले. महाराष्ट्र सरकारच्या अहवालाच्या आधारे केंद्र सरकारने पूजा खेडकर यांच्या उमेदवारीबाबतचे दावे आणि इतर आरोपांची चौकशी करण्यासाठी एक सदस्यीय समिती स्थापन केली आहे. खोटे दावे केल्याप्रकरणी खेडकर दोषी आढळल्यास त्यांची निवड रद्द होऊ शकते. यूपीएससीच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने खेडकर यांच्याविरुद्ध फसवणूक, बनावट कागदपत्रे बनवण्याचा गुन्हा दाखल केला आहे. गेल्या आठवड्यात समितीने आपला अहवाल डीओपीटी सचिवांना सादर केला होता. डीओपीटी टिम या अहवालातील निष्कर्ष तपासत आहे.

# इस्त्रायल-हिजबुल्ला युद्धाचा धोका वाढला

### दहशतीमुळे लोकांकडून स्थलांतर

**तेल अवीव :** लेबनॉनच्या हिजबुल्लाने गोलन टेकड्यांवर रविवारी रॉकेट्सनी हल्ले केले होते. एका फुटबॉल मैदानात कोसळलेल्या रॉकेट्समुळे १२ मुलांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर इस्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यात मोठ्या युद्धाची भीती व्यक्त केली जात आहे. इस्रायलच्या सीमेनजीक राहणाऱ्या लोकांमध्ये दहशत आहे. लेबनॉन-इस्रायल सीमेपासून ५० किलोमीटरपेक्षा कमी अंतरावर असलेले हाइफा विद्यापीठ कुठल्याही प्रकारची जोखीम पत्करू इच्छित नाही. विद्यापीठाने स्वतःच्या ३० मजली इमारतीत ५ व्या मजल्यापेक्षा वरच्या भागात काम करणाऱ्या लोकांना वर्क फ्रॉम होमची सुविधा दिली आहे. ही इमारत हिजबुल्लाहच्या निशाण्यावर असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# मेधा पाटकर यांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेला स्थगिती

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी २३ वर्षांपूर्वी केलेल्या मानहानीच्या खटल्यात नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांना सुनावलेल्या पाच महिन्यांच्या साध्या कारावासाच्या शिक्षेला येथील न्यायालयाने सोमवारी स्थगिती दिली आणि पाटकर यांना २५ हजार रुपयांच्या जामिनाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. पाटकर यांनी दाखल केलेल्या अपीलावर, महानगर दंडाधिकारी राघव शर्मा यांनी शिक्षेला स्थगिती दिली आणि विरुद्ध पक्षाला (एलजी) नोटीसही जारी केली, असे सक्सेना यांचे वकील गजिंदर कुमार यांनी सांगितले. याप्रकरणी न्यायालयाने पाटकर यांना १ जुलै रोजी तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. पाटकर यांनी सक्सेना यांना भ्याड आणि हवाला व्यवहारात त्यांचा सहभाग असल्याचा आरोप करणारी त्यांची विधाने केवळ बदनामीकारकच नाहीत, तर त्यांच्याबद्दल नकारात्मक समज निर्माण करण्यासाठी रचण्यात आल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने पाटकर यांना २४ मे रोजी दोषी ठरवले होते.


### जम्मू-काश्मीरमधील स्फोटात चौघांचा मृत्यू

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमध्ये सोमवारी झालेल्या स्फोटात ४ जण मृत्युमुखी पडले. ती घटना बारामुल्ला जिल्ह्यातील सोपोरमध्ये भंगारमालाच्या दुकानात घडली. त्या दुकानात एका ट्रकमधून काही सामग्री उतरवली जात होती. त्यावेळी अचानकपणे मोठा स्फोट झाला. त्यामुळे संबंधित परिसर हादरला.

# सेक्स रॅकेटप्रकरणी महिलेस अटक

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी मुंबई :** ग्रँट रोड परिसरातील एका कुंटणखान्यात सुरू असलेल्या सेक्स रॅकेटचा पर्दाफाश करून डी. बी मार्ग पोलिसांनी एका महिलेस अटक केली. रेखा पियो बिस्वास असे या महिलेचे नाव असून तिच्याविरुद्ध भादवींसह पिटा कलमांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. याच गुन्ह्यांत तिला स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. या महिलेवर कारवाई केल्यानंतर याच कुंटणखान्यातून तीन महिलांची सुटका करण्यात आली. वैद्यकीय



तपासणीनंतर या महिलांना चेंबूरच्या नवजीवन महिला सुधारगृहात पाठविण्यात आले आहे.

गेल्याच आठवड्यात ग्रँट रोडच्या दोन कुंटणखान्यात पोलिसांनी छापा टाकून तिथे चालणाऱ्या सेक्स रॅकेटचा पर्दाफाश केला. या कारवाईत पोलिसांनी एका महिलेसह दोघांना अटक करून बारा महिलांची सुटका केली. ही कारवाई सुरू असातनाच ओम इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील एका रुममध्ये सेक्स रॅकेट चालते. काही महिलांना तिथे डांबून ठेवून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त केले जात आहे.

### एका अज्ञाताने केलेल्या चाकू हल्ल्यामध्ये आठ जण जखमी

**इंग्लंड :** इंग्लंडच्या उत्तर पश्चिम भागात असलेल्या साऊथपोर्टमध्ये एका अज्ञाताने केलेल्या चाकू हल्ल्यामध्ये आठ जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये काही मुलांचाही समावेश आहे. साऊटपोर्ट भाग लिव्हरपूर शहराजवळ आहे. मर्सीसाइट पोलिसांनी या हल्ल्याबाबत माहिती देताना सोमवारी दुपारी या चाकू हल्ल्याची माहिती मिळाल्याचे सांगितले.

# यंदाच्या गटारीला मासेप्रेमींना बोचणार दराचा काटा

**मुंबई :** सोमवारपासून श्रावण सुरू होत असल्याने अनेक जण त्याआधी गटारीचे नियोजन करण्यात व्यस्त आहेत. मात्र, मासेप्रेमींसाठी माशांचे भाव गगनाला भिडल्यामुळे या गटारीला वाढत्या दराचा काटा बोचणार असल्याचे चित्र स्पष्ट आहे. अनेक जण आपआपल्या सोयीनुसार गटारीचे प्लॅनिंग करतात. त्यावेळी चिकण, मटण आणि माशांवर ताव मारला जातो. मात्र, यावेळी गटारीचा आंनद घेताना तुम्हाला माशांना मुकावे लागणार आहे. सध्या पावसामुळे मासेमारी बंद असल्याने आणि बाजारामध्ये माशांची आवक कमी होत असल्याने बाजारात मासे उपलब्ध नाही, त्यामुळे मागणी अधिक आणि पुरवठा कमी म्हणून मासे प्रचंड महाग झाले आहेत. मुंबईमध्ये सुरमई १ हजार रुपये, तर पापलेट १३०० रुपये किलोने मिळत आहे.



**मुंबई :** येत्या स्वातंत्र्य दिन समारंभाच्या निमित्ताने संरक्षण मंत्रालय देशभर १५ लाख वृक्षांची लागवड करण्याची मोठी मोहीम हाती घेणार आहे. ही वृक्ष लागवड मोहीम, एक पेड माँ के नाम, या मोहिमेचा भाग म्हणून केली जाणार आहे. या उपक्रमात तिन्ही सेवा दलांसह संरक्षण, संशोधन आणि विकास संघटना (डिआरडिओ) सीजीडीए अर्थात संरक्षण लेखा विभाग, एनसीसी राष्ट्रीय छात्र योजना, शस्त्रास्त्र निर्मिती कारखाने यासारख्या सर्व संबंधित संघटना या मोहिमेत सहभागी होणार आहेत.

# बहुसंख्य विद्यार्थी किमान शारीरिक शिक्षणापासून वंचित

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** जगातील बहुसंख्य शाळकरी मुलांना अद्याप किमान आवश्यक शारीरिक शिक्षण मिळत नाही, असे संयुक्त राष्ट्राच्या गुणवत्तापूर्ण शारीरिक शिक्षणावरील पहिल्या अहवालात म्हटले आहे. युनेस्कोच्या शिक्षण संघाने प्रकाशित केलेल्या 'ग्लोबल स्टेट ऑफ प्ले' या अहवालात असे दिसून आले की, केवळ ५८ टक्के देशांनी मुलींसाठी शारीरिक शिक्षण सक्तीचे केले आहे आणि जगभरातील केवळ ७ टक्के शाळांनी मुले आणि मुलींसाठी समान शारीरिक शिक्षणाची वेळ निश्चित केली आहे.

जगभरातील दोन तृतीयांश माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आणि अर्ध्याहून जास्त प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक किमान साप्ताहिक शारीरिक शिक्षण शिकवले जात नाही. वृत्तसंस्थेशी संवाद साधताना तज्ज्ञाने सांगितले की, प्राथमिक शाळेतील दोन शिक्षकांपैकी एकापेक्षा कमी शिक्षकाने शारीरिक शिक्षणाचे विशेष प्रशिक्षण घेतले आहे.

### जगभरातील ५८ देशांचा सहभाग

युनायटेड नेशन शारीरिक शिक्षणास प्रोत्साहन देण्याच्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात योगदान देण्याच्या क्षमतेमुळे शारीरिक शिक्षण जगभरातील आरोग्य आणि शिक्षण व्यावसायिकांमध्ये व्यापक चर्चेचा विषय बनले आहे. शारीरिक शिक्षणामध्ये मुली आणि अपंग विद्यार्थ्यांच्या समावेशाबाबत, जगभरातील ५८ टक्के देश मुख्य प्रवाहातील सेटिंगजमध्ये त्यांचा सहभाग नोंदवतात, तरीही प्रदेशांमध्ये लक्षणीय असमानता अजूनही अस्तित्वात आहे.

### संयुक्त राष्ट्राचा अहवाल



# व्हेनेझुएलाच्या अध्यक्षीय निवडणुकीत मादुरो विजयी

### निकालाला विरोधी पक्षांनी नाकारले

वृत्तसंस्था

**काराकस :** व्हेनेझुएलात झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीत निकोलस मादुरो यांना विजयी घोषित करण्यात आले आहे; परंतु विरोधी पक्षांचे नेते या निकालाला विरा करण्याची तयारी करत आहेत. मादुरो यांना ५१ टक्के मते तर मुख्य विरोधी उमेदवार एडमुंडो गोंजालेज यांना ४४ टक्के मते मिळाल्याचे राष्ट्रीय निवडणूक परिषदेने सोमवारी पहाटे जाहीर केले. मादुरो यांच्या निष्ठावंतांकडून नियंत्रित निवडणूक प्राधिकरणाने आतापर्यंत ३० हजार



मतदान केंद्रांवरील अधिकृत मतदानाची आकडेवारी जारी केलेली नाही. याचमुळे विरोधकांनी या निकालाला मानण्यास नकार दिला आहे. तर विदेशी नेत्यांनीदेखील या निकालाला मान्यता दिलेली नाही. निवडणूक प्राधिकरणाने पुढील काही तासांमध्ये अधिकृत आकडेवारी जारी करण्याचे आश्वासन दिले आहे. मादुरो सरकारने जो निकाल जाहीर केला आहे, त्यावर विश्वास ठेवणे अवघड असल्याचे चिली या देशातील डाव्या पक्षाचे नेते गॅब्रियल बोरिक यांनी म्हटले आहे. घोषित करण्यात आलेला निकाल व्हेनेझुएलाच्या लोकांची इच्छा किंवा मतांना प्रतिबिंबित करत नसल्याने गंभीर चिंता असल्याचे अमेरिकेचे विदेशमंत्री एंटनी ब्लिंकेन यांनी टोकियो येथे बोलताना म्हटले आहे.

# ब्राह्मण परिषदेच्या प्रमुख मागणीला यश

## बाजीराव धर्माधिकारी : इनाम व देवस्थान जमिनी होणार वर्ग एक

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठवाडा विभागात मोठ्या प्रमाणावर खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये आणण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामुळे परळीत घेण्यात आलेल्या ब्राह्मण ऐक्य परिषदेच्या ठरावातील प्रमुख मागणीला यश मिळाले आहे. या निर्णयाचे ब्राह्मण ऐक्य परिषद अध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व राज्यातील सर्व सहकाऱ्यांनी स्वागत केले आहे. अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण होणार असून लाखो नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांमधील खालसा झालेल्या इनाम जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यासंदर्भात मोठा पुढाकार घेतला होता. तेही या बैठकीला प्रामुख्याने उपस्थित होते. काल झालेल्या बैठकीमध्ये मदतमाश जमीनीच्या हस्तांतरणासाठी नजुल जमीनींचे हस्तांतरण नियमित करणेबाबत शासनाने यापूर्वी घेतलेल्या निर्णयाप्रमाणेच मदतमाश जमिनीच्या हस्तांतरणाकरिता बाजारमूल्य ५% दराने नजराणा आकारण्यात यावा, याकरिता सदर प्रस्ताव लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर निर्णयार्थ ठेवण्यात यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मराठवाडयात साधारणतः ४२,७१० हेक्टर इतकी खिदमतमाश जमीन आहे. या खिदमतमाश जमीनींवर देखील मोठया प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत, तसेच बेकायदेशीर बांधकामे देखील झालेली आहेत. त्यामुळे अशा जमीनीच्या हस्तांतरणाची तरतूद उपलब्ध करुन देण्याची गरज निर्माण झाली होती.याकरिता यथायोग्य प्रस्ताव तातडीने मंत्रिमंडळासमोर निर्णयार्थ ठेवण्यात यावा, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.या १००% नजराणा रकमेवरील ४०% रक्कम देवस्थानच्या कायमस्वरुपी देखभालीकरिता देण्यात येणार असून २०% रक्कम देवस्थानच्या अर्चकासाठी देण्यात येणार आहे तर उर्वरित ४०% रक्कम शासनाकडे जमा करण्यात येईल. उपरोक्त दोन्ही निर्णयांमुळे मराठवाडयातील सामान्य नागरिकांचा सुमारे ६० वर्षापासूनचा प्रलंबित असलेला जमीनींसंदर्भातील प्रश्न संपुष्टात येणार आहे. या निर्णयामुळे मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यांमध्ये जवळपास ५५ हजार हेक्टर जमिनी खुल्या होणार आहेत.बैठकीस खा. अशोक चव्हाण, सुरेश धस, राणा जगजितसिंह पाटील, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे, उपमुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी आदी उपस्थित होते.दरम्यान गेल्या अनेक वर्षापासून ब्राह्मण संघटनांच्या वतीने विविध मार्गाने ही मागणी शासन दरबारी मांडण्यात येत होती. त्याचप्रमाणे परळी वैजनाथ येथे झालेल्या ब्राह्मण ऐक्य परिषदेत सर्व ब्राह्मण संघटनांनी एकमुखाने या संदर्भात प्रमुख ठराव पारित केला होता. या प्रमुख ठरावा पैकी एक महत्त्वपूर्ण विषय शासनाने गांभीर्याने घेऊन या निर्णयाला आज तत्वत: मान्यता दिली असून लवकरच याचा अंतिम निर्णय शासन घेणार आहे. त्यामुळे ब्राह्मण ऐक्य परिषदेच्या या मागणीला यश आले असून ही सर्वांना दिलासा देणारी बाब असल्याची प्रतिक्रिया ब्राह्मण ऐक्य परिषदेचे अध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी दिली आहे.या निर्णयाचे ब्राह्मण ऐक्य परिषदेने स्वागत केले आहे.






### महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घ्यावा

ब्राह्मण ऐक्य परिषदेच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्नांवर प्रमुख ठराव पारित करण्यात आले होते. यामध्ये ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे अशी मागणी आहे. या संदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन महामंडळ स्थापन करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले होते. मात्र या दृष्टीने शासन स्तरावरून अद्याप निर्णय झालेला नाही. परशुराम आर्थिक विकास महामंडळ अधिकृत घोषित करावे अशी मागणी ही ब्राह्मण ऐक्य परिषदेचे अध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांनी केली आहे.

# वंचितने रास्तारोको अंदोलन मागे

## निवेदन: रस्त्यासाठी उचलले होते पाऊल



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

अनेकदा लेखी निवेदन देऊन देखील मंजूर असलेला उमापूर फाटा ते उपबाजार समीती पर्यंत रस्ता नाल्यांसह करत नसल्यामुळे उमापूर ग्रामस्थांना सोबत घेऊन वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी गेवराई – शेवगाव रोडवरील उमापूर फाटा येथे रास्ता रोको करण्यात आला यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता ऋषीकेश गौंढरे यांनी वंचितचे निवेदन स्विकारुन २० दिवसात प्रत्यक्षात रोड व नालीच्या कामाला सुरुवात करतोत असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

उमापूर हे जिल्हा परिषद गटाचे मोठ्या सर्कलचे गाव आहे परंतु गावाला खेडेगाव जोडण्यासाठी रस्ते नसल्याने गावातील बाजारपेठ पूर्णत: ठप्प झाली. यास केवळ निवडणुकीवेळी मते मिळवुण घेण्यासाठी तोंडी अश्वासने देऊन निवडून आल्यानंतर गावाकडे पुढील निवडणुकी पर्यंत पाऊलही न ठेवणारे पुढारी कारणीभूत आहेत.

उमापूरला जोडणारे माटेगाव, राक्षसभुवन, मालेगाव (बु, खु), पाथरवाला(खु, गु), सुरळेगाव, श्रीक्षेत्र पंचाळेश्वर, बोरपिंपळगाव, भाट अंतरवली, कुंभेजळगाव, ब्रह्मगाव, खळेगाव, पौळाचीवाडी, दादोबाची वाडी, ठाकरवाडी, नरसिंह तांडा, पिंगळे वस्ती, खंडोबा वस्ती यांना डांबरी रस्ता नसल्याने लोक उमापूर ऐवजी पैठण, बोधेगाव, गेवराई, शहागडकडे जात असल्याने उमापूरची बाजारपेठ ठप्प झाल्याने व्यवसाईक हवालदित झाला आहे. उमापूर – माटेगाव रोडवरील उमापूर फाटा ते उपबाजार समीती पर्यंत रस्ता नाल्यांसह मंजूर आहे परंतु प्रशासनाच्या वेळकाढू धोरणामुळे तसेच आळशी लोकप्रतिनिधी यांच्या संथ कारभारामुळे हा रस्ता भात शेती करण्यासारखा चिखलमय झाला असल्याने पादचाऱ्यांना पाई चालने मुश्कील झाले आहे. म्हणून वंचित बहुजन आघाडीचे ज्ञानेश्वर हवाले, राजाभाऊ पोकळे, यशवंत कापसे, मुबारक शेख, वसिम शेख, रामदास मोरे, भरत मोरे यांच्यासह इरफान शेख, जावेद शेख, सखाराम हारहारे, लक्ष्मण पोकळे, आप्पा वैद्य, भारत चौरे, राजु शेवाळे, नितीन कापसे, मतीन शेख यांनी रास्तारोको मध्ये सहभाग नोंदवला होता. अश्वासन दिल्यानुसार २० दिवसात रस्ता व नाल्याच्या कामाला सुरुवात केली नाही तर सर्व ग्रामस्थांना सोबत घेऊन तिव्र स्वरूपाचे अंदोलन करु असा ईशारा ज्ञानेश्वर हवाले, राजाभाऊ पोकळे, मुबारक शेख यांनी मनोगत व्यक्त करतांना दिला.

# गेवराई सरपंच संघटनेची स्थापना

## अध्यक्ष कालिदास नवले, उपाध्यक्ष शितल साखरे तर सचिवपदी भास्कर हातागळे

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील सर्व सरपंचांनाना सतत येणाऱ्या अडीअडचणी जाणीवपूर्वक होणाऱ्या तक्रारी, चौकशा यावर आळा बसवण्यासाठी व सरपंचाच्या विविध प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी गेवराई तालुका सरपंच संघटनेची स्थापना करण्यात आली आसून यामध्ये अध्यक्षपदी कालिदास नवले, उपाध्यक्ष शितल साखरे, तर सचिवपदी भास्कर हातागळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

सोमवार दि.२९ रोजी पंचायत समिती सभागृहात झालेल्या बैठकीत ही या सरपंच संघटनेची स्थापना करून कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या बैठकीत तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतीच्या सरपंच यांना काम करताना अनेक अडचणी येत आहेत. यामध्ये प्रशासकीय स्तरावर होणारी अडवणूक, राजकीय द्रेषातून गावपातळीवर होणाऱ्या तक्रारी या तक्रारीतून लाभार्त्यावर होणारा अन्याय यासह अनेक अडचणींचा सामना गावचा प्रमुख असलेल्या सरपंचांना करावा लागत आहे.





यासाठी संघटनात्मक बांधणी करून या अडचणी सोडवण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज लक्षात घेता या संघटनेची स्थापना केली. यामध्ये सर्वानुमते तालुकाध्यक्षपदी कालिदास नवले, उपाध्यक्षपदी शितल साखरे, सचिवपदी भास्कर हातागळे, कायदेविषयक सल्लागार म्हणून ऍड.नारायण शिंदे तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून पत्रकार भागवत जाधव यांची निवड करण्यात आली. तर सदस्य म्हणून निर्मला संभाजी आहेर, सोमित्रा आसाराम कबले, गोपीनाथ फलके, रितेश साबळे, नीता अंगद मैंद, पांडुरंग पवार, प्रल्हाद गायकवाड, रत्नमाला संतोष लाखे, योगेश रामभाऊ गाडे, वंदना शाम मुळे, बंडू नाना पवार, अरुणा नवले, श्रीराम उबाळे, ज्ञानेश्वर जाधव यांच्यासह आदींच्या निवडी करण्यात आल्या. ही संघटना कुठल्याही राजकीय पक्षाशी बांधील नसून यामध्ये सर्व पक्षीय सर्वच सरपंच सहभागी झाले आहेत. यावेळी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. दरम्यान यापुढे कुठल्याही सरपंचावर अन्याय झाला असेल तर सर्वांनी एकत्र येऊन त्यांच्या पाठीशी ही संघटना खंबीरपणे उभा राहील असा विश्वास तालुकाध्यक्ष कालिदास नवले यांनी व्यक्त केला.

# साहित्य जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

## अभिनंदनिय: प्रेमानंद गज्वी यांना पुरस्कार प्रदान

परळी/पुण्यभुमी प्रतिनिधी

सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंती दिनानिमित्ताने दरवर्षी देण्यात येणाऱ्या साहित्य जीवन गौरव आणि कलागौरव पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, या वर्षीची पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील साहित्य जीवन गौरव पुरस्कार जेष्ठ साहित्यीक ,अ.भा. नाट्यसंमेलनाध्यक्ष नाटककार , प्रेमानंद गज्वी यांना जाहीर झाला आहे.



आयु. प्रेमानंद गज्वी (मुंबई) हे मराठी नाटककार, कवी, विचारवंत म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून जीवनभर त्यांनी लेखन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव हा त्यांच्या लेखणीतून कायम दिसून आला. त्यांच्या प्रत्येक नाटकात समाजातील एखाद्या समस्येवर प्रखर प्रकाश झोत टाकलेलाच दिसतो. वंचित, पिडीतांचा दबलेला आवाज मुखर करण्यासाठी जीवनभर व्रतस्थपणे काम करणा–या साहित्य निष्ठेचा गौरव यंदाचा पद्मश्री डॉ. विखे पाटील साहित्य जीवन गौरव पुरस्कार देवून करण्यात येणार असून, स्मृतीचिन्ह, १ लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.मान्यवरांच्या उपस्थितीत नारळी पौर्णिमेच्या दिवशी सदरील पुरस्काराचे वितरण होणार आहे.



# आ. संदिप क्षीरसागरांचा पाठपुरावा

औरंगाबाद/पुण्यभूमी प्रतिनिधी

मागील मोठ्या कालावधी पासून बीड शहरातील बाह्यवळण रस्त्यावर स्लिप रस्ता व शहरातील दोन्ही प्रमुख मार्गावर उड्डाणपूल तयार व्हावा यासाठी आ.संदीप क्षीरसागर पाठपुरावा करत आहेत. यासंदर्भात मंगळवारी (दि.३०) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक श्री. इंगोले यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी लवकरात लवकर काम सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी माजी आमदार सय्यद सलीम साहेब उपस्थित होते.

**डॉ.गणेश ढवळे** | वंजारवाडी वस्ती शाळेचा प्रश्न तडीस

# उघड्यावरच्या शाळेला मिळाले छत!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शाळे अंतर्गत येणाऱ्या वंजारवाडी वस्ती वरील जिल्हा परिषद शाळेला १० वर्षांपासून ईमारत नव्हती. वस्तीवरील ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून उभारलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये शाळा भरत होती.मात्र दोन महिन्यांपूर्वी आलेल्या वादळ वा–याने पत्र्याचे शेड उडुन गेले.त्यामुळे शाळेतील मुलांना रोज झाडाखाली तर पाऊस आल्यावर जनावरांच्या गोठ्यात शिक्षण घ्यावे लागत असे या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दि.१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाला व शिक्षण विभागाला लेखी निवेदनाद्वारे दिला होता.यासंदर्भात सर्वच दैनिकानी मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी देत शाळेतील विद्यार्थ्यांना न्याय देण्याची मागणी केली होती.

आज दि.२९ सोमवार रोजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी शिक्षण विभागाचे अधिकारी यांची जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन वंजारवाडी शाळेच्या इमारतीसाठी निधीची उपल्बध करून देण्याची आणि जनावरांच्या गोठ्यात भरणारी शाळा पक्या ईमारतीत स्थलांतरित करण्याचे आदेश दिले होते.त्याअनुषंगाने गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वडवणी बाबासाहेब उजगरे यांनी वंजारवाडी येथे प्रत्यक्ष भेट देत माजी शाळ व्यावस्थापन समिती अध्यक्ष बळीराम भानुदास मुंडे यांच्या आरसीसी इमारतीमध्ये भरविण्यात येत असल्याचे लेखी पत्र शिक्षणाधिकारी (प्राथमिक) समग्र शिक्षा जिल्हा परिषद बीड यांना पाठवले आहे.



### प्रसार माध्यमांनी विद्यार्थ्यांना न्याय दिला

वंजारवाडी वस्तीशाळेवरील १ ते ५ इयत्तेतील २३ विद्यार्थी पटसंख्या असणाऱ्या विद्यार्थ्यांना ईमारती अभावी आणि लोकवर्गणीतून बांधण्यात आलेले पत्र्याचे शेड उडुन गेल्यावर झाडाखाली आणि पाऊस आल्यावर जनावरांच्या गोठ्यात शिक्षण घ्यावे लागत होते याबाबत सर्वच प्रिंट मिडीया , इलेक्ट्रॉनिक मिडिया , युट्यूबवर बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर अखेर जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाला जाग आली आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळाला.

# उत्पन्नवाढीसाठी तंत्रज्ञान अवगत करावे

## डॉ.बाबासाहेब ठोंबरे : महापूर येथे शेतकरी प्रशिक्षण

लातूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

कृषि महाविद्यालय, लातूर व ग्रामपंचायत मौजे महापूर, ता.जि. लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम आणि कृषिऔद्योगिक संलग्नता उपक्रमांतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम मौजे महापूर येथे दि.३०/०७/२०२४ रोजी उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून कृषि महाविद्यालय,लातूरचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे, तर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उत्तम वरवटे ,गणपतराव ढमाले, उद्घाटक संदीप माने, प्रमुख मार्गदर्शक डॉ.दयानंद मोरे, कार्यक्रम समन्वयक डॉ.ज्योती देशमुख, कार्यक्रम अधिकारी डॉ. नितीन तांबोळी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ठीक ०८.०० वाजता कै.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले कि शेतकरी हे खरे शास्त्रज्ञ असून, कृषि विद्यापीठ निर्मित तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पन्न वृद्धी करावी व त्यातून स्वावलंबी व्हावे . उपस्थित शेतकऱ्यांसोबत डॉ. दयानंद मोरे संवाद साधताना म्हणाले की पिकांवरील किडीच्या व्यवस्थापनासाठी फक्त रासायनिक कीटकनाश्कांवर अवलंबून न राहता एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. मार्गदर्शन करताना खरीप हंगामातील प्रमुख पिके जसे सोयाबीन, तूर,उडीद,मुग इ. पिकातील किडींची नुकसान व व्यवस्थापन या बद्दल माहिती देण्यात आली . कार्यक्रम समन्वयक डॉ. ज्योती देशमुख यांनी प्रस्तावना सादर केली . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल सपाटे व सिद्धरामेश्वर पाटील तर आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी डॉ नितीन तांबोळी यांनी केले . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निखिल लिंबाळकर, शिवसाहेब पाटे ,राहुल पवार ,साहिल पेअर ,राजकुमार ,पियुष बनिया ,पवन पायरे ,ऋषिकेश मुंढे ,वैष्णवी नाईकनवरे, मनीषा राठोड ,गायत्री पौल, सृष्टी जाधव ,रिचा भारती ,प्रियांका शिंदे यांनी विषेश परिश्रम घेतले. यावेळी ग्रामस्थ, शेतकरी, कृषिदूत व कृषिकन्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.

